रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ ◆ अंक १३३

www.ramprahar.com

◆ रविवार, ३० नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पोयनाड येथील दरोडाप्रकरणी आरोपींना सक्तमजुरी/२

'रविप्रहर'निमित्त विविध विषयावरील लेख/४

'खेलो इंडिया'त महाराष्ट्राचे महिलाराज; पदकांची लयलूट/८

## गडचिरोलीत भूमिपूत्रांना रोजगार देणार –मुख्यमंत्री



**गडचिरोली :** गडचिरोली नगर परिषदेवर भाजपची सत्ता आल्यास या शहराला स्मार्ट सिटी बनवू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. गडचिरोली, देसाईगंज व आरमोरी नगर परिषदेच्या निवडणुकीत रिंगणात असलेल्या भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गडचिरोली येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. गडचिरोली जिल्ह्यात तीन लाख कोटींची गुंतवणूक येत असून, जल, जंगल व जमिनीचे रक्षण करून भूमिपूत्रांना रोजगार देण्यावर भर राहील. एकूणच गडचिरोलीचा विकास होणार असून, हा जिल्हा दक्षिण भारताचं प्रवेशद्वार बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. आपण मुख्यमंत्री असेपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी भूमिगट गटार योजना आणि घनकचरा व्यवस्थापनाची योजना राबवू, असेही आश्वासन दिले.

### पनवेल मतदारसंघात महिला सक्षमीकरणाला प्राधान्य

# चार हजारांहून अधिक महिलांना मिळणार शिलाई व घरघंटी मशीन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत घरघंटी व शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या चार हजारहून अधिक पात्र लाभार्थींना सोमवार दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी पासून शिलाई व घरघंटी मशीनचे वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा खनिकर्म अधिकारी अमर देवेकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांच्यासह विविध विभागातील अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेला हा उपक्रम पनवेल मतदारसंघात घरगुती उद्योगांना नवी दिशा प्रदान करणारा ठरणार आहे. महिलांच्या हाती रोजगाराचे साधन दिल्यास त्यांच्या कुटुंबाच्या उन्नतीपासून समाजाच्या प्रगतीपर्यंत मोठा सकारात्मक बदल घडतो. त्यामुळे आमदार प्रशांत



ठाकूर यांनी त्या दृष्टिकोनातून संकल्पना प्रत्यक्षात साकार केली. त्यांनी संबंधित प्रशासनाकडे या संदर्भात पाठपुरावा केला. त्या अनुषंगाने प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला. हि योजना पारदर्शक पणे करण्यासाठी इच्छुक महिलांकडून घरघंटी किंवा शिलाई मशिन यासाठी महिलांचे अर्ज मागविण्यात आले. आणि त्या अर्जाची व संबंधित कागदपत्रांची शासकीय नियमाने पडताळणी करण्यात आली. त्यामधून निवड झालेल्या पात्र लाभार्थींना त्या वस्तूचे आणि प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येणार आहे.

*आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून स्वयंरोजगाराचा स्तुत्य उपक्रम*

पनवेल मतदारसंघात सुरु होणारा हा उपक्रम महिला उद्योजकतेला बळ देणारा ठरणार आहे. या उपक्रमामुळे पनवेल मतदारसंघातील महिलांच्या आर्थिक प्रगतीला चालना देणारे आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असून, या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी मार्ग प्रशस्त होत आहे. याचबरोबर पुढील टप्प्यातही हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, इच्छुक महिलांनी आपली नोंदणी करून आगामी आर्थिक वर्षांत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून त्यांना लाभ घेता येणार आहे.

# महाडच्या विकासासाठी सुसंस्कृत नेतृत्वाला संधी द्या –प्रवीण दरेकर

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपालिका निवडणुकीत महाड शहराचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर, राजकारण हा धंदा करणाऱ्यांपेक्षा सुसंस्कृत नेतृत्वाला संधी द्यावी, असे आवाहन भाजप राष्ट्रवादी युतीच्या उमेदवारांच्या प्रचारादरम्यान महाराष्ट्र स्वयंपुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी महाड येथील काकर तळे सभेदरम्यान व्यक्त केले.

राजकारण हा एक धंदा होत चालला असून हे चित्र बदलण्यासाठी व महाड शहराला सुसंस्कृत असे नेतृत्व मिळवून देण्यासाठी माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांच्या नेतृत्वाखालील होत असलेल्या निवडणुकीत भाजपा राष्ट्रवादीच्या नगराध्यक्ष पदासह सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन आमदार प्रवीण दरेकर यांनी महाड येथील प्रचार सभेतकेले.



या वेळी बोलताना दरेकर म्हणाले की ही युती महाडचा ऐतिहासिक व भविष्यातला वेध घेणारे ठरणार असून महाडसारख्या ऐतिहासिक व सांस्कृतिक भूमीमध्ये सुसंस्कृत नेतृत्वाची गरज असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

या वेळी प्रवीण दरेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी थेट दूरध्वनीवरून संपर्क साधून सभेदरम्यान मुख्यमंत्र्यांकडून महाडच्या विकासाचे आश्वासन जनतेला देण्यात आले. तसेच चौदारतळे या क्रांती भूमीवरील सत्याग्रहाला शंभर वर्ष पूर्ण होत असून हा शताब्दी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी चवदारतळे प्राधिकरणाची निर्मितीचे या वेळी मुख्यमंत्र्यांकडून जाहीर करण्यात आली.

महाड नगरपालिकेचे हद्दीतील करवा प्रसूती गृह याठिकाणी नव्याने महिलांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू करणार असून यातून महिलांचा आर्थिक विकास होणार असल्याचे ते म्हणाले. मुंबई बँकेच्या माध्यमातून आपण लाडक्या बहिणीना एक लाखाचे बिनव्याजी कर्ज वाटप केले असून या व्याजाचा परतावा शासनाकडून होणार असल्याने भविष्यात महाडमधीलही लाडक्या बहिणींना अशा पद्धतीच्या योजनांचा लाभ मिळवून देणार असल्याचे ते या वेळी म्हणाले. निवडणुकीमध्ये एका मताची ताकद ही प्रचंड असून त्याची किंमत टाटा बिर्ला प्रमाणेच सर्वसामान्य मतदारांचीदेखील सारखीच असते, त्यामुळे असे मत पैसे देऊन विकत घेता येत नाही असेही दरेकर या वेळी म्हणाले. **(पान २ वर..)**



## पेणमध्ये आम्ही अनेक विकासात्मक कामे केली –आमदार रविशेठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून पेणमध्ये अनेक विकासात्मक कामे आम्ही केली आहे, त्यामुळे ३ तारखेला पेणचा निकाल निश्चित असून संपूर्ण महाराष्ट्रातून पेणचेच उमेदवार बहुमतांनी निवडून आणण्याचे काम आपले असून ही जबाबदारी आपण चोख पार पडायची आहे, असे आवाहन आमदार रविशेठ पाटील यांनी प्रभाग क्र. ७ मध्ये आयोजित प्रचारसभेत केले.

प्रभाग क्र. ७ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार आफरीन अखवारे, सुभाष आवास्कर तसेच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रितम पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. या सभेस खासदार धैर्यशील पाटील, माजी जि.प. सदस्य डी. बी. पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, झैन नाईक, माजी नगरसेवक देवता साकोस्कर, माजी नगरसेवक शहनाज मुजावर, लियाकत मुजावर, शहबाज मुजावर, फैय्याज इनामदार आदींसह भाजप कार्यकर्ते तसेच मुस्लिम, कोळी समाजबांधव उपस्थित होते.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून पेणमधील जनतेशी एक आपुलकीचे नाते निर्माण झाले असून पेण शहर म्हणजे आपले कुटुंब या भावनेतून नगराध्यक्षा प्रितम पाटील या काम करीत आहेत. मुस्लिम समाज दफनभूमी, बोरा समाज दफनभूमी, तलाव सुशोभीकरण, स्मशानभूमी सुशोभिकरण, रिंग रोड अशी अनेक कामे प्रितम पाटील यांच्या कारकिर्दीत झाली असून शहरातील रस्ते सुद्धा सिमेंट काँक्रीटचे होत आहेत त्यासाठी निधी सुद्धा आला आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### महाराष्ट्र–छत्तीसगड सीमेजवळ ११ नक्षलवादींचे आत्मसर्मपण

**गोंदिया :** महाराष्ट्र–छत्तीसगड राज्याच्या सीमेवर गोंदिया पोलिसांनी मोठी कारवाई करत ११ नक्षलवादीयांनी स्वतःहून आत्मसमर्पण केले आहे. ही मोठी कारवाई गडचिराली परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक अंकुश गोयल, गोंदियाचे पोलिस अधीक्षक गोरख भामरे. तसेच देवरीचे अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

### मतदानाच्या दिवशी अधिकृत सुट्टी जाहीर

**मुंबई :** पहिल्या टप्प्यासाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून या दिवशी अधिकृत सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. निवडणूक असलेल्या सर्व क्षेत्रांमध्ये हा आदेश लागू राहणार आहे. मतदारांना कोणत्याही अडथळ्याशिवाय मतदान करता यावे, यासाठी सरकारने ही महत्त्वाची घोषणा केली आहे. शुक्रवारी जारी झालेल्या शासकीय निर्णयानुसार, ज्या जिल्ह्यांमध्ये मंगळवारी मतदान होईल, त्या ठिकाणच्या सर्व कर्मचाऱ्यांना सवेतन सुट्टीचा हक्क प्राप्त असेल.

## श्रीलंकेत चक्रीवादळातील मृत्युमुखींची संख्या १२३वर

### मदतीसाठी भारताचे 'ऑपरेशन सागर बंधू'



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेत दितवाह चक्रीवादळामुळे मुसळधार पाऊस आणि पुराने थैमान घातलं आहे. जनजीवन विस्कळीत झालं आहे. आपत्ती व्यवस्थापन केंद्राने (डीएमसी) दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १२३ लोकांचा मृत्यू झाला आहे, तर १३० जण अजूनही बेपत्ता आहेत. श्रीलंकेच्या अनेक भागात मुसळधार पाऊस आणि भूस्खलन झालं आहे, ज्यामुळे लाखो लोक प्रभावित झाले आहेत.

श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सशस्त्र दलांच्या मदतीने मदत कार्य सुरू आहे आणि आतापर्यंत ४३,९९५ घरं उद्ध्वस्त झालेल्या लोकांना सरकारी कल्याण केंद्रांमध्ये हलवण्यात आलं आहे. श्रीलंकेच्या सरकारने अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी लष्करी हेलिकॉप्टर आणि बोटींचा वापर केला आहे. दितवाह चक्रीवादळामुळे शुक्रवारी श्रीलंकेच्या उत्तर आणि मध्य भागात मुसळधार पाऊस आणि भूस्खलन झाले. मुसळधार पावसामुळे अंदाजे ४४,००० लोक प्रभावित झाले आणि अनेकांना तात्पुरत्या मदत छावण्यांमध्ये पाठवण्यात आले. दितवाह चक्रीवादळाचा तडाखा बसलेल्या श्रीलंकेला मदत करण्यासाठी भारताने ऑपरेशन सागर बंधू सुरू केले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, भारतीय हवाई दलाचे विमान सुमारे १२ टन मदत साहित्य घेऊन श्रीलंकेत पोहोचले, ज्यात ताडपत्री, ब्लँकेट, स्वच्छता किट, अन्नपदार्थ आणि इतर आवश्यक साहित्य समाविष्ट आहे.

भारतीय नौदलानेही मदत साहित्य पाठवलं आहे. आयएनएस विक्रांत आणि आयएनएस उदयगिरी येथून सुमारे ४.५ टन रेशन आणि २ टन रेशन पोहोचवण्यात आलं.

## राज्यपाल देवव्रतांचा उलवे येथे सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा शनिवारी (दि.२९) देशभरातील डीएव्ही महाविद्यालय शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल उलवे येथील भूमिपुत्र सभागृह येथे सत्कार करण्यात आला.

राज्यपाल देवव्रत हे डीएव्ही संस्थेचे माजी विद्यार्थी असून ते कुरुक्षेत्र हरियाणा येथे निवासी गुरुकुल चालवतात. शिक्षकांनी आपल्या आचरणातून मुलांपुढे आदर्श ठेवावेत तसेच मुलांना भारतीय जीवन मूल्यांशी जोडावे असे राज्यपालांनी सांगितले.

डीएव्ही संस्थेच्या वतीने झालेला सत्कार हा आपल्याच कुटुंबाकडून झालेला सत्कार आहे, असे सांगताना आपल्या जडणघडणीत महर्षी दयानंद, आर्य समाज व डीएव्ही संस्थेचे मोठे योगदान आहे, असे राज्यपालांनी सांगितले.



## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांच्या आज तीन सभा

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीतील महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची रविवारी (दि.३०) खोपोली, कर्जत आणि उरण येथे सभा आयोजित केली आहे.

खोपोलीतील समाजमंदिर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोरील प्रांगणात दुपारी ३ वाजता या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आल्याचे पक्षाचे वरिष्ठ नेते व आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी कार्यकर्त्यांच्या बैठकीत माहिती दिली. या बैठकीत या सभेच्या नियोजनाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी काही कार्यकर्त्यांना उपयुक्त सूचना दिल्या. खोपोली, कर्जत व उरण या तिन्ही ठिकाणी महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ सभेचे आयोजन करण्यात आले आहे प्रत्येक उमेदवारांनी आपल्या प्रभागातील कार्यकर्त्यांना सोबत आणण्याविषयी सूचना करण्यात आल्या. ज्यांना जी जबाबदारी दिली आहे ती कार्यकर्त्यांनी पार पाडावी असेही या वेळी सांगण्यात आले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार यांनी केले. या वेळी, खोपोली प्रभारी सुनील घरत, खोपोली शहर अध्यक्ष अजय इंगुलकर, महिला शहर अध्यक्ष अश्विनी अत्रे, यशवंत साबळे त्याचप्रमाणे खोपोलीतील पदाधिकारी, पनवेलचे मान्यवर नेते तसेच खोपोली शहरातील कार्यकर्ते उपस्थित होते.



**पनवेल : येथील तहसीलदार मिनल भामरे यांनी शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. भेटीदरम्यान पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या विविध शासकीय योजना, नागरिकांना सेवा देताना प्रशासन आणि जनप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक मजबूत व्हावा याबाबतही चर्चा झाली. त्याचप्रमाणे तालुक्यातील वाढत्या लोकसंख्येनुसार मूलभूत सुविधांचा विस्तार, पायाभूत विकास, वाहतूक व्यवस्थापन आणि शैक्षणिक–सामाजिक प्रकल्प यांच्या प्रगतीबाबतही विचारविनिमय झाला.**

## नवी मुंबई विमानतळावरून कोइम्बतूर आणि चेन्नईदरम्यान होणार उड्डाणे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून देशांतर्गत उड्डाण केले जाणार आहे. या विमानतळावरून अनेक विमान कंपन्यांचे विमान उड्डाण घेणार आहेत. इंडिगो, अकासा एअर आणि एअर इंडिया एक्सप्रेस या कंपन्यांनी प्रवासी वे सेवा सुरू करण्याबाबत नवी मुंबई विमानतळाच्या व्यवस्थापनाने करार केला आहे. बंगळुरू आणि दिल्लीनंतर आता देशांतील काही प्रमुख शहरांमध्ये विमान सेवा सुरू करणार आहे.

इंडिगोने शनिवारी नवी मुंबई विमानतळावरून नवीन विमान उड्डाणे सुरू करण्याची घोषणा केली. लवकरच नवीन अतिरिक्त उड्डाणे सुरू होणार आहेत. यामध्ये नवी मुंबई ते कोइम्बतूर, चेन्नई, वडोदरा



आणि उत्तर गोवा यासारख्या प्रमुख देशांतर्गत ठिकाणांशी कनेक्टिव्हिटी सुरू होणार आहे. आयएएनएस वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, इंडिगो कंपनी २९ डिसेंबर २०२५ पासून नवी मुंबई विमानतळावरून कोइम्बतूर आणि चेन्नई दरम्यान दररोज उड्डाणे चालवणार आहेत.

नवी मुंबईहून सकाळी ९ वाजता निघणारे विमाने कोइम्बतूरला सकाळी १०:४५ वाजता पोहोचेल, परतीसाठी तर कोइम्बतूरहून सकाळी ११:१५ वाजता निघणारे विमान दुपारी ०१:०५ वाजता नवी मुंबईला उतरेल. विमान कंपनीने पुढे सांगितले की, चेन्नईहून सकाळी ०६:१० वाजता उड्डाण करेल आणि नवी मुंबईला सकाळी ०८:१५ वाजता पोहचेल. नवी मुंबईहून परतीचे विमान संध्याकाळी ७:४० वाजता सुटेल. ते विमान चेन्नईला रात्री ९:३५ वाजता पोहचेल, अशी आयएएनएस वृत्तसंस्थेने माहिती दिली आहे.

शिवाय, नवी मुंबई–वडोदरा ही विमान सेवा आठवड्यातून पाच वेळा असणार आहे. जी ३० डिसेंबर २०२५ रोजी सुरू होईल. तर, नवी मुंबई– उत्तर गोवा ही विमान सेवा सुद्धा आठवड्यातून पाच वेळा असणार आहे. ज्याची सुरूवात २६ डिसेंबर २०२५ पासून होणार आहे. ज्यामुळे मुंबईच्या विमानतळापासून इतर भागांपर्यंत चांगली कनेक्टिव्हिटी निर्माण होईल.

## नवी मुंबईतून सहा अल्पवयीन मुली गायब

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरातील विविध भागांतून अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या घटनांची मालिकाच सुरू झाली आहे. रबाळे, एपीएमसी आणि कोपरखैरणे ठाण्यांच्या हद्दीतून चार मुली गायब झाल्याच्या ताज्या प्रकरणांनंतर,




तुर्भे आणि एनआरआय सागरी पोलीस ठाण्यांतून आणखी दोन मुली बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांत नोंदविलेल्या या तक्रारींमुळे नवी मुंबईतील अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पालकांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

तुर्भे पोलीस ठाण्याच्या हद्दीत १४ वर्षीय मुलगी घरातून बाहेर पडल्यानंतर परत न आल्याची तक्रार कुटुंबीयांनी नोंदवली आहे. परिसरातील सीसीटीव्ही, मार्गावरील हालचाली आणि मोबाईल लोकेशन्स यांचा तपास सुरू असून, एखाद्याने फूस लावून तिला पळवून नेल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, एनआरआय सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १६ वर्षीय मुलगी रहस्यमयरीत्या गायब झाली आहे. ती घरात एकटी असताना अचानक दिसेनाशी झाली असून तिचा मोबाईल बंद असल्याने शोधमोहीम अधिक आव्हानात्मक झाली आहे. **(पान २ वर..)**

# अलिबागमधील निवासी संकुलाची घरपट्टी रद्द करू -सतीश धारप

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगरपरिषदेवर भाजपा – शिवसेनेची युतीची सत्ता आली तर तीन महिन्यात अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील निवासी संकुलाची घरपट्टी रद्द करण्यात येईल, अलिबाग नगरपरिषदेची हद्दवाढ करण्यास प्राधान्य देऊ, अलिबागच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटावा यासाठी सांबरकुड धरण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू , अशी घोषणा भारतीय जनता पार्टी दक्षीण रायगड जिल्हा सरचिटणीस सतीस धारप यांनी कैली.



भाजपाच्य अलिबाग येथील कार्यालयात शनिवारी (दि. २९) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सतीश धारप बोलत होते. अलिबाग नगरपरिषद निवडणुकीतील भाजपच्या – शिवसेना यातीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार तनूजा पेरेकर, भाजपा दक्षीण रायगड जिल्हा महिला अध्यक्ष सौ. चित्रा पाटील, भाजपा दक्षीण रायगड जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते. अ‍ॅड. आस्वाद पाटील, गिरीश तुळपुळे, डॉ. उदय जोशी, अ‍ॅड. पल्लवी तुळपुळे, भाजपा अलिबाग शहर अध्यक्ष अ‍ॅड. अंकित बंगेरा आदी यावेळी उपस्थित होते.

आपली सत्त टिकून रहावी म्हणून अलिबाग नगरपरिषदेत गेली अनेक वर्षे सत्तेत असलेल्यांनी अलिबागची हद्दवाढ करण्याचा प्रयत्न केला नाही. अलिबाग शहरा लगतच्या कुरूळ, वेश्वी, चेंढरे, वरसोली या ग्रामपंचायतींचा सामवेश अलिबाग नगरपरिषदेत करून अलिबाग नगरपरिषदेची हद्द वाढ केल्यास विकास कामे करण्यात जागा उपलबध्द होईल. अलिबागकारांना चांगल्या सुविधा उपलबध्द करून देता येईल. लोकसंख्या वाढेल. अलिबाग शहाराची लोकसख्या एक लाखापेक्षा जास्त झाल्या अलिबाग नगरपरिषद अ वर्गात जाईल. त्यामुळे शासनाकडून मिळणारा निधी वाढेल. हा निधी विकासकामांवर खर्च करता यईल. म्हणून अलिगा नगर परिषदेची हद्दवाढ केली जाईल, असे धारप म्हणाले.

अलिबाग शहारातील निवासी संकुलांची घरपट्टी रद्द करण्यात येईल. त्यासाठी राज्य शासनाकडून वेगळा निधी आणला जाईल. नगरपरिषदेच्या महसूल उत्पन्नवर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही. अलिबाग नगरपरिषदेची स्वतःहाची पाणीपुरवठा योजना नाही. त्यामुळे सांबरकुंड धरण होणे आवश्यक आहे. हे धरण येत्या चार वर्षात पुर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सतीश धारप यांनी सांगितले.

सांबरकुड धरणामुळे विस्थापित होणार्या आदिवासींच पुवर्सन कण्यासाठी शासनाने पैसे दिले आहेत. परंतु काही लोक स्वतःच्या स्वर्थासाठी अदिवासीना चढवून या कामता काही लोक खो घालत आहेत, अशी टीका धारप यांनी केली.

अलिबाग नगरपरिषदेव गेली कित्तेक वर्षे सत्ता असलेल्यांनी डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न समस्या सोडवला नाही, शहराच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवली नाही. क्रीडांगण, उद्यान तयार केली नाहीत, भुयारी गटार योजना अयशस्वी केली त्यामुळे अलिबगाकर नारज आहेत. अलिबागकरांना एक घरत सत्ता ठेवायची नेहा. त्यांना बदला हवा. यापूर्वी अलिबागकरांना पर्याय दिसत नव्हाता आता आम्ही पर्याय दिला आहे. त्यामुळे आलिबाकर भाजप – शिवसेना युतीच्या उमेदवरांना मतदान करतील, अलिबगामध्ये युतीचा विजय होईल, असा विश्वस सतीश धारप यांनी व्यक्त केला.

# पोयनाड येथील सुरभी ज्वेलर्स दरोडा प्रकरणातील दहा आरोपींना सक्त मजूरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

पोयनाड येथील सुरभी ज्वेलर्सवर दरोडा प्रकरणातील दहा आरोपींना अलिबागच्या विशेष सत्र न्यायाधीश सुशीला तिवारी यांनी सक्त मजूरीची शिक्षा सुनावली, तसेच दंडही ठोठावला.

जिनाह उर्फ जे के नैनुद्दीन मोहम्मद लौबी(५५), इमराद इस्माईल मुजावर(३०) करणराम आशिष विश्वकर्मा(४०), बिलाल कासिम कुरेशी(२४), समीर भगवान पाटील(२३), प्रदिप उर्फ बबलू लक्ष्मण पाटील(२३), सनी उर्फ चैतन्य सुनील पाटील,(२९), बिपीन बाफना(३५) महम्मद अकबर कासिम, मुबीन सगीर शेख अशी शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोयनाड येथील सुरभी ज्वेलर्सवर दि. २६ ऑगस्ट २०१५ रोजी रात्री ९ वा. ही घटना घडली होती. आरोपींनी बंदुकीचा धाक दाखवून ८० लाख रुपये किमतीचे दागिने आणि ९ लाख रुपयांची रोकड पळवून नेली होती. या घटनेतील एका आरोपीला स्थानिकांनी पकडले होते. मात्र उर्वरीत आरोपी फरार होण्यात यशस्वी झाले होते.

सुरवातीला पोयनाड पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्या नंतर रायगडच्या स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक जितेंद्र व्हनकोटी, पोयनाड पोलीस ठाण्याचे प्रभारी राजमोहम्मद राजे आणि सायबर सेलचे प्रमोद बडाख यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून फरार झालेल्या १२ आरोपींपैकी १० आरोपींना अटक केली होती.

या प्रकरणाचा तपास करून पोलीसांनी अलिबाग येथील विशेष सत्र न्यायालयात या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणाची सुनावणी अलिबागच्या विशेष सत्र न्यायाधीश सुशीला तिवारी यांच्या समोर सुरू होती. ज्यात जिल्हा सरकारी अभियोक्ता म्हणून अ‍ॅड्. संतोष पवार यांनी काम पाहीले. न्यायालयाने दहा आरोपींना शिक्षा ठोठावली.

# ‘रयत’च्या वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्ये स्काऊट–गाईड शिबिर उत्साहात

**वाशी : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्ये इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय स्काऊट–गाईड शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शिबिराची सुरुवात ध्वज फडकावून आणि प्रार्थनेने करण्यात आली. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी तंबूत राहण्याचा अनुभव घेतला तसेच स्वतः स्वयंपाक बनविण्याचा आनंद लुटत स्वावलंबन, शिस्त आणि सहकार्याचे धडे आत्मसात केले. शिबिराच्या निमित्ताने स्काऊट–गाईड चळवळीचे संस्थापक लॉर्ड रॉबर्ट स्टेफन्सन स्मिथ बेडन–पॉवेल यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. १९०७ मध्ये त्यांनी स्काऊट चळवळीची स्थापना करत जागतिक स्तरावर नेतृत्व, शिस्त आणि समाजसेवेची मूल्ये रुजवली. त्यांच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत उत्साहाने सहभाग नोंदवला.



विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या शिबिराला रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, उपविभागीय अधिकारी विलास जगताप, प्राचार्या सुमित्रा भोसले यांसह शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी यांनी भेट देऊन शिबिरार्थ्यांना प्रोत्साहन दिले. शिबीर यशस्वीरित्या पार पडण्यासाठी स्काऊट–गाईडचे प्रमुख शिक्षक व पर्यवेक्षक आबासाहेब वाघ, कुमार भोईर, मेघनाथ मढवी, मंजुषा कारंडे आणि नंदिनी मोगल यांनी विशेष परिश्रम घेऊन शिबिराचे सुयोजन केले. एकूणच, या एकदिवसीय शिबिरातून विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुण, टीमस्पिरीट, शिस्त आणि समाजभावना यांचा अनुभव घेत उत्साहात सहभाग नोंदवला.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर सकाळी ११.०० वाजता मॅनेजमेंट असोसिएशन तर्फे फॅकल्टी एक्स्चेज प्रोग्रॅमचे आयोजन केले होते.



या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रामसाठी एमजीएम महाविद्यालयातील प्रा. डॉ. सोनीया पंत यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना ऑपरेशन रिसर्च या विषयातील बारकावे, वेगवेगळ्या संकल्पना या विषयी मार्गदर्शन केले तसेच या व्याख्यानाचा लाभ विद्यार्थी व विद्यार्थिनीनी घेतला व त्यांच्या शंकांचे निरसन केले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅमचे आयोजन मॅनेजमेंट स्टडीज विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रित ठुले यांनी केले तसेच प्रा. अर्पिता नायक, प्रा. रेहणुमा खान, प्रा. शितल चव्हाण, प्रा. स्नेहा नाईक, प्रा. निशिगंधा शिंपी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# तळा येथील शाळांना स्मार्ट बोर्ड भेट

**तळा : प्रतिनिधी**

दुर्गवीर प्रतिष्ठान आणि ब्लॅक अ‍ॅण्ड वीच कंपनीच्या वतीने गो. म. वेदक विद्यामंदिर, ज्युनियर कॉलेज तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा, तळा यांना अत्याधुनिक स्मार्ट बोर्ड भेट देण्यात आले. डिजिटल शिक्षणाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल विद्यार्थ्यांसाठी मोठी शैक्षणिक उभारी ठरणार आहे.

या कार्यक्रमास तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे,रा.जि.प.शाळा तळाचे शा.व्य.स.अध्यक्ष भास्कर गोळे ,मंगेश देशमुख, कंपनीचे सीएसआर कॉर्डिनेटर वैभव चव्हाण, सदस्य योगेश उपाध्याय,अभिजित तापिसे, दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हसुरकर, उपाध्यक्ष रवींद्र रावराणे, सचिव सागर टक्के, रायगड जिल्हा प्रमुख रामजी कदम, मंदार गावकर, गो म वेदक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक दिलीप ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी दुर्गवीर प्रतिष्ठान व ब्लॅक अ‍ॅण्ड वीच कंपनीचे सर्व पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. वैभव चव्हाण यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्मार्ट बोर्डचा शैक्षणिक प्रगतीसाठी अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन केले. दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हसुरकर,यांनी ग्रामीण–डोंगराळ भागातील शाळांना सहकार्य करत असल्याचे सांगितले.

# तळोजा औद्योगिक वसाहतीमधील घनकचरा संकलन आणि व्यवस्थापन व्यवस्था भक्कम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

’स्वच्छ पनवेल सुंदर पनवेल’ या उद्देशाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी महापालिका क्षेत्रातील चारही प्रभाग व औद्योगिक वसाहतींमधील घनकचरा व्यवस्थापनावरती विशेष लक्ष दिले आहे.



यामध्ये तळोजा औद्योगिक वसाहतीमधील घनकचरा संकलन, वाहतूक व व्यवस्थापनाची जबाबदारी महानगरपालिकेमार्फत काटेकोरपणे पार पाडली जात असून, या कार्यासाठी महापालिकेने नियुक्त केलेल्या मे. ए. जी. इनविरो इन्फ्रा प्रोजेक्ट लि. या कंत्राटदारामार्फत नियमित सेवा पुरविली जात आहे. महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणाऱ्या सरासरी ५०० टन कचऱ्यापैकी सुमारे २० ते २५ टन कचरा तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातून जमा केला जातो. महिन्याला जवळपास ७०० टन कचऱ्याचे संकलन व वाहतूक केली जाते.

संकलित कचऱ्याची प्रक्रिया सिडकोच्या घनकचरा प्रक्रिया केंद्रात केली जात असून, या प्रक्रियेसाठीचा खर्च महानगरपालिकेमार्फत सिडको प्राधिकरणास अदा केला जातो.

महापालिकेच्या आकडेवारीनुसार महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या एकूण कचऱ्यापैकी ५ टक्के कचरा तळोजा एमआयडीसीमधून निर्माण होत असून, या कचऱ्याच्या संकलन व प्रक्रिया व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेला वार्षिक सुमारे रु. २.६८ कोटी इतका खर्च होत आहे. तथापि, तळोजा औद्योगिक क्षेत्रातून मिळणारे घनकचरा उपयोगकर्ता शुल्क अत्यल्प असून या माध्यमातून केवळ रु. २९.७५ लाख इतका महसूल प्राप्त होतो.

# महायुतीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे हाजी अरफात शेख यांचे खोपोलीकरांना आवाहन

**खोपोली: प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाचे लोकप्रिय नेते माजी अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष तथा नवभारतीय शिव वाहतूक संघटनाचे अध्यक्ष हाजी अरफात शेख यांनी खोपोली शहराला विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी, आणि पारदर्शक कारभारासाठी थेट नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह महायुतीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.



यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भाजपा अल्पसंख्यांक नेते हाजी अरफात शेख , महायुतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे, खोपोली शहर निवडणूक निरीक्षक प्रकाश बिनेदार व खोपोली सहकारी संपर्क प्रमुख मा.नगराध्यक्ष सुनिलभाई घरत,भाजप अल्पसंख्यांक खोपोली प्रभारी सय्यद अकबर, शहरध्यक्ष अजय इंगूळकर, अल्पसंख्याक समाजाचे जेष्ठ नेते फजल मुल्ला ,विनय मोरे ,विक्रम यशवंतशेठ साबळे, आरिफ शेख,अनवर खोत यांच्या सह अनेक प्रभागातील महायुतीचे उमेदवार व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महायुतीचे शेंडेच नगराध्यक्ष होतील अश्या शुभेच्छा देत ह्या वर्षीच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सर्वाधिक मताधिक्य मिळविण्याचा मान प्रभाग क्र. ११ मधील भाजप मुस्लिम महिला उमेदवार सानिया शेख व त्यांचे सह उमेदवार विक्रम साबळे यांना द्यायचा आहे असे सांगत ,त्यांना निवडून देण्यासाठी पूर्ण ताकतीने काम करूया

पूर्ण महाराष्ट्राला सानिया शेख या अल्पसंख्याक भगिणीच्या विजयाच्या माध्यमातून भाजप पक्षाची मुस्लिम समाजाच्या प्रति असलेला सकारात्मक संदेश या निमित्ताने देऊया असा आवाहन या निमित्ताने माजी अध्यक्ष अल्पसंख्याक आयोग हाजी अरफात शेख यांनी व्यक्त करत सर्व महायुतीच्या उमेदवारांना शुभेच्छा दिल्या.

पान १ वरुन

## महाडच्या विकासासाठी सुसंस्कृत नेतृत्वाला संधी द्या – प्रवीण दरेकर





माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप म्हणाल्या की, आपल्या काळामध्ये शहराच्या कायापालट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. महाड शहर स्वच्छ करून अनेक पात्यांवरील सात कोटींचे पुरस्कार देखील मिळवून दिले. कोरोनाच्या संकट काळात माझे वडील तुम्हा आम्हा सगळ्यांचे आबा आपल्याला सोडून गेले मात्र तरीही खचून न जाता मी महाडकरांच्या सेवेसाठी प्रत्येक वेळी उपस्थित राहिले. आबांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन मी महाड नगरपालिकेचा पारदर्शक कारभार केला. त्यामुळेच आज महाड नगरपालिकेचे भव्य असे प्रशासकीय भवन साकार होऊ शकले. आम्ही २४ तास राजकारण करत नाही मात्र विकासाचा दृष्टिकोन सातत्याने सांभाळत असतो.

भविष्यकाळात प्रवीण भाऊंची साथ असल्याने महाड शहरासाठी विकासासाठी भाऊंच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार असून महाड शहराचा सार्वांगिन विकास होणार असल्याचा विश्वास व्यक्त केली. या वेळी व्यासपीठावर भाजप राष्ट्रवादी युतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सुदेश कळमकर, बिपिन महामुणकर, धनंजय देशमुख, नागेंद्र राठोड, चंद्रकांत बुवा जाधव, महाड तालुका अध्यक्ष निलेश तळवटकर, निलेश देवगिरकर आदी मान्यवर व पक्षाचे उमेदवार उपस्थित होते.

**५५ कोटीच्या मच्छी मार्केटचा प्रस्ताव मंजूर**

*दरम्यान, प्रवीण दरेकर यांनी महाड शहराच्या विकासासाठी मी देखील योगदान दिलेले असले असून, नुकत्याच ५५ कोटीच्या मच्छी मार्केटचा प्रस्ताव मंजूर केला असल्याचे सांगितले. तसेच स्वयंपूर्ण विकासाच्या माध्यमातून महाड शहरातील जुन्या इमारती पुनर्बांधणीसाठीदेखील प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.*

## पेणमध्ये आम्ही अनेक विकासात्मक कामे केली –आमदार रविशेठ पाटील

विरोधकांकडून पाण्याचे राजकारण केले जात आहे, परंतु पाण्यासाठी आलेला निधी कोणी बुडवला याचे उत्तर विरोधकांनी जनतेला द्यावा, सामान्य जनतेला देशोधडीला लावण्याचे काम यांनी केले आहे. हेच लुटारू आता नगर परिषद सत्ता बळकावू पाहत आहेत. विरोधकांना साधे २४ उमेदवारही उभे करता आले नसून यातूनच त्यांची झालेली अवस्था बिकट दिसत आहे. पेणमध्ये प्रामुख्याने प्रलंबित असलेला पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी १६० कोटीची योजना आगामी काळात अमलात आणण्यात येईल, असे वचन या वेळी रविशेठ पाटील उपस्थित नागरिकांना दिले.

या वेळी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी सांगितले की, भाजप महायुतीच्या माध्यमातून पेणसाठी विकास निधी आणण्याचे काम आम्ही केले. यासाठी नुसती भाषण करून चालत नाही तर कृती करावी लागते. मुस्लिम समाज, कोळी समाजबांधव यांच्याशी एक कौटुंबिक नाते निर्माण केले आहे. मोहल्ला, कोळीवाडा आपला आहे हा विश्वास असून येथील नागरिक आपल्या पाठीशी ठाम राहणार, अशी भावना प्रितम पाटील यांनी व्यक्त केली.

## नवी मुंबईतून सहा अल्पवयीन मुली गायब

या मुलीचे नाव यापूर्वी काही प्रकरणांत नमूद असल्याची नोंद पोलिसांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे तपासाची दिशा अधिक व्यापक ठेवून पोलिसांनी छाननी सुरू केली आहे.

रबाळे, एपीएमसी आणि कोपरखैरणे पोलीस ठाण्यांतही अशाच प्रकारे चार मुली घरा बाहेर पडल्यावर परत न आल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. बेपत्ता होण्याची कारणे अद्याप स्पष्ट नसून, अनेक प्रकरणांत कुटुंबीयांना कोणताही पुरावा किंवा हालचाल दिसून आलेली नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार अल्पवयीन मुलगी हरवल्यास तातडीने अपहरणाचा गुन्हा नोंदविणे बंधनकारक असल्याने सर्व प्रकरणांत भा.द.वि. ३६३ च्या अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

नवी मुंबई पोलिसांनी या सर्व प्रकरणांचा एकत्रित आढावा घेत संयुक्त तपास सुरू केला आहे. विविध पोलीस ठाण्यांतील अधिकारी, तपास पथके आणि तांत्रिक पथके सीसीटीव्ही, मोबाईल लोकेशन्स, मित्रपरिवाराशी चौकशी तसेच पूर्वीच्या नोंदींचा सखोल अभ्यास करून तपास पुढे नेत आहेत. मात्र अद्याप कोणत्याही मुलीचा ठोस मागमूस मिळालेला नाही. या घटनांनी शहरातील पालकांची चिंता वाढवली असून, शाळा–कॉलेज परिसरापासून वसाहती आणि सार्वजनिक जागांत मुलांच्या सुरक्षेबाबत चर्चा पुन्हा वाढू लागली आहे.

दरम्यान, शहरातील नागरिकांनी सतर्क राहून याबाबत कोणतीही संशयास्पद माहिती मिळाल्यास पोलीस ठाण्यांत देण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. तसेच आपल्या अल्पवयीन मुलांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि सुरक्षिततेबाबत त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचेही पोलिसांचे म्हणणे आहे.

शहरातील वाढत्या बेपत्ता मुलींच्या तक्रारींनी नवी मुंबईत गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, या सर्व मुलींचा तातडीने शोध लागावा, ही अपेक्षा पालक आणि नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# उरण तालुक्यात वायू प्रदुषणात वाढ

## नागरिकांना श्वसनाचे आजार



**उरण : प्रतिनिधी**

मागील आठवड्यात गुलाबी थंडीला प्रारंभ झाला होता.मात्र चार-पाच दिवस अचानक पुन्हा तापमानात वाढ झाल्याने हवा व प्रदूषणातही वाढ झाल्याने सर्दी,खोकला आणि श्वषणाच्या आजारातही वाढ झाली आहे. या वाढत्या प्रदूषणाचा सामना करण्यासाठी नागरिक मुखपट्टीचा वापर करीत आहेत.

उरणला जोडणाऱ्या आम्रमार्ग ते जेएनपीए त्याच प्रमाणे जेएनपीए ते पळस्पे या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात धुळ निर्माण होत असल्याने वाहनचालकांही जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. उरण – पनवेल महामार्गावर प्रदूषणात अधिक वाढ झाली आहे. वाढत्या धुळीकणामुळे उरण व पनवेल मधिल हवेची मात्रा अत्यंत वाईट पातळीवर पोहोचली आहे.

वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या सर्दी खोकल्याच्या तक्रारी वाढल्या असल्याची माहिती उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.बाबासाहेब काळेल यांनी दिली आहे. तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जेएनपीए आणि ओएनजीसी येथे हवा गुणवत्ता मोजणी यंत्र बसविल्याची माहिती विभागीय अधिकारी विक्रांत भालेराव यांनी दिली आहे.

# रिक्षाचालकाला अज्ञात दोघांनी लुटले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानाशेजारी एका रिक्षा चालकाला दोघा अज्ञातांनी जबर मारहाण करून लुटल्याने शहर पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदाना बाहेरील झाडाखाली रिक्षाचालक पंकज गजानन म्हात्रे (वय २२) हे रिक्षा थांबवून मैदानाच्या पूर्वेकडील बाजूला रिक्षातच विश्रांती घेत असताना स्कुटीचरून आलेल्या दोघांनी एका अल्पवयीन मुलास मारझोड केली.

रिक्षाच्या मागच्या बाजूला कुणाला तरी मारहाण होत असल्याचे लक्षात येताच पंकज रिक्षातून उतरून त्या दोघांना जाब विचारू लागल्याने हल्लेखोरांनी त्या मुलाला सोडून पंकज म्हात्रे यांच्यावरच प्राणघातक हल्ला चढविला. पिसाळलेल्या त्या दोघा हल्लेखोरांनी लाथा बुक्कपानी पंकज म्हात्रे यांना मारहाण केली. त्यांचे डोके, गळ्यावर आणि पाठीवर जखम होईपर्यंत त्यांना मारले. त्यानंतर रिक्षाच्या मागील सीटवर ठेवलेला मोबाईल जबरदस्तीने त्यांनी पळवून नेला. या बाबतची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

## निवडक

### मोकळ्या प्लॉटमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** विचुंबे गावातील थॉमस विद्यालयाजवळ असलेल्या मोकळ्या प्लॉटमध्ये एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत. अनोळखी बेवारस पुरुष जातीचे प्रेत वय अंदाजे ४० वर्ष अंगाने किरकोळ, चेहरा उभट, केस व दाढी काळे, नाक सरळ व मोठे, डोळे काळे असून अंगात चौकडा फूल बाहयाचा शर्ट, निळी जिन्स पँट घातलेली आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** पनवेल शहर परिसरात एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल पोलीस करत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्षीय, रंग सावळा, उंची ५ फूट ५ इंच, चेहरा उभट, अंगाने मजबूत, डोक्याचे केस काळे – पांढरे , दाढी मिशीचे केस पांढरे वाढलेले, डाव्या हाताच्या कोपराजवळ जुनाट जखमा असून अंगात काळसर रंगाची फुल पॅन्ट व निळ्या रंगाचा हाफ बाह्याचा टीशर्ट व पायात निळे शुज घातलेले आहेत. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण येथील वीर वाजेकर महाविद्यालयात भारताच्या संविधानपूर्तीस ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ संदीप घोडके यांच्या पुढाकाराने अंतर्गत गुणवत्ता सुधार समिती सह आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.



भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्याचा ग्रंथ नाही, तर विकसित भारत २०४७ साठीचा मार्गदर्शक रोडमॅप आहे. नागरिकांचा सहभाग, पारदर्शक सुशासन आणि सामाजिक समता यांचा अंमल झाला तर भारताच्या शाश्वत विकासयात्रेला कुणी थांबवू शकत नाही, असे परिषदेचे प्रमुख वक्ते व आंतरराष्ट्रीय परिषदेचे सन्माननीय उद्घाटक डॉ. देवानंद शिंदे (मुंबई, शिवाजी, संभाजीनगर व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी चेअरमन )यांनी मनोगतात मत व्यक्त केले.

जगभरातील संशोधक, संविधानतज्ज्ञ, धोरणविशेषज्ञ आणि विद्यापीठांचे प्रतिनिधी यांच्या सहभागाने ही परिषद अत्यंत यशस्वीरीत्या पार पडली. परिषदेमध्ये भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क, कर्तव्ये, सामाजिक न्यायाचे तत्त्व, डिजिटल लोकशाही, जागतिकीकरणाचा प्रभाव, तसेच २०४७ पर्यंत भारताने साध्य करावयाचे विकासमानके या विविध विषयांवर सखोल चर्चा झाली.

परिषदेमध्ये रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत यांनी अध्यक्षीय मनोगतात राज्य व केंद्र शासनाची विकसित भारतासंदर्भातील भूमिका अधोरेखित केली. प्राचार्य वाल्मीक गरजे, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, दोन्ही सत्रांचे प्रमुख, परिसरातील शिक्षणप्रेमी उपस्थित होते. प्राध्यापक एस. पी. कांबळे कोल्हापूर, डॉ सौ. अभिनय रमेश मुंबई , प्राध्यापक लियाकत खान मुंबई विद्यापीठ, प्राध्यापक अनिल पाटील गडहिंग्लज कोल्हापूर, विजयानंद सेवराज टेक्सास राज्य अमेरिका, डॉ रमेशचंद्र शुक्ला जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली, प्राध्यापक हर्षद भोसले कीर्ती कॉलेज मुंबई, प्राध्यापक तानाजी पोळ पालघर यांनी दिवसभरातील विविध सेशनचे मार्गदर्शक व सत्राध्यक्ष म्हणून परिषदेच्या प्रमुख व विविध उप घटकांवर भाष्य केले, मत मांडली.

परिषदेमध्ये ऑनलाईन पद्धतीने विविध विद्यापीठातील तसेच तज्ञ प्राध्यापक ,संशोधक विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावरील विश्लेषक जेष्ठ प्राध्यापक डॉ अशोक चौसाळकर तसेच रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश ठाकूर व इतर महाविद्यालयाचे प्राचार्य, अभ्यासक यांनी व इतर साधारणतः ३०० च्या अधिक जिज्ञासूंनी आवर्जून उपस्थिती दाखवून परिषदेच्या विषयाचे महत्त्व या माध्यमातून अधोरेखित केले.

रयत शिक्षण संस्थेच्या स्थापना दिनी ४ ऑक्टोबर २०२५ रोजी डॉ घोडके यांनी सदर आंतरराष्ट्रीय परिषदेची संकल्पना मांडली. त्यानंतर सतत प्रभारी प्राचार्य डॉ अमोद ठक्कर व परिषदेचे संयोजक डॉ संदीप घोडके यांनी डॉ राहुल पाटील, सर्व विभाग प्रमुख, शिक्षकांनी परिषद यशस्वी होण्याकरिता परिश्रम घेतले.

# १४,७९६ अर्जदारांनी केला सिडकोसाठी अर्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोतर्फे सादर करण्यात आलेल्या प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावरील ४,५०८ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेस नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. योजनेचा प्रारंभ झाल्यापासून आजपर्यंत तब्बल १४,७९६ अर्जदारांनी ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया सुरू करून कागदपत्रे सादर केली आहे.

या संपूर्ण प्रक्रियेसाठी सिडकोतर्फे २१ डिसेंबर २०२५ पर्यंत कालावधी देण्यात आला आहे. सिडकोतर्फे प्रथमच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर सादर करण्यात आलेल्या योजनेला नागरीक भरघोस प्रतिसाद देत आहेत. येत्या काही दिवसांत आणखीन नागरीक आपले घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सिडकोच्या या गृहनिर्माण योजनेत सहभागी होतील अशी सिडकोला खात्री आहे. अर्जदारांच्या कागदपत्रांची छाननी करून, पात्र अर्जदारांची योजनेकरिता अंतिम नोंदणी करून २८ डिसेंबर २०२५ पासून पात्र अर्जदार आपले पसंतीचे घर ऑनलाईन पद्धतीने निवडू शकतील. आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येकाचे स्वप्न सिडकोच्या या गृहनिर्माण योजनेतून नवीन वर्षात साकार होईल यात काही शंका नाही, असा दावा सिडकोतर्फे करण्यात आला आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात भित्तिपत्रक स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२९) कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातर्फे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सव वर्षनिमित्त 'वॉल ऑफ विस्डम' महाविद्यालयीन भीतीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेमध्ये महाविद्यालयांमधील विविध शाखेतील स्पर्धकांनी उस्फुर्त व उत्साहात सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून अभिजित जोगदंडे (सहाय्यक शिक्षक, रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय ओवेपेठ) आणि मानसी कोष्टी (सहाय्यक शिक्षक, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

या कार्यक्रमासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख साहेब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन व सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व विजेत्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा. प्रथमेश उदेकर समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, तसेच रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर, प्रभाकर जोशी, (कार्यकर्ता भारतीय जनता पार्टी खारघर), दीपक शिंदे (सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर, खारघर मधील भारतीय जनता पार्टीचे इतर सर्व कार्यकर्ते व सर्व विभागप्रमुख या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

या स्पर्धेचे आयोजन प्रा.विशाल देशमुख, कॉमर्स व अकाउंटन्सी विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रमोद वाघे, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी स्वयंसेवक यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. तनुजा सुमन यांनी सर्वांचे आभार मानले.

# एमएनएम विद्यालयात एड्यू फेस्ट २०२५ उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वैज्ञानिक दृष्टिकोन सर्जनशीलता, तार्किक विचारसरणी, अन्वेषण वृत्ती, अंगीभुत कौशल्य यांचे सादरीकरण विविध प्रकल्प, प्रतिकृती, यांच्या माध्यमातून करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारे एड्यू फेस्ट २०२५ आयोजन जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालयात करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. एड्यू फेस्ट २०२५ उद्घाटन गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांनी फीत कापून केले. शाश्वत विकास,, नैसर्गिक सेंद्रिय शेती, कचरा व्यवस्थापन, गणितीय संकल्पना मांडणी व संगणकीय विचार, अन्न आरोग्य, स्वच्छता, वाहतूक आणि संपर्क व्यवस्था या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक, प्रतिकृती व प्रकल्पांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. वरील एड्यु फेस्ट मध्ये ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रदर्शनाबद्दल आपले मत नोंदवताना प्रदर्शनाचे उद्घाटक गव्हाणचे उपसरपंच विजय घरत यांनी विद्यार्थ्यांचे त्यांनी तयार केलेल्या व प्रतिकृती, प्रकल्प यासाठी घेतलेल्या मेहनतीचेकौतुक केले तसेच अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता, वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करण्यासाठी सहाय्यक आहेत असे नमूद केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे कौतुक करत, अशा प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या अंगीभुत कौशल्यांची ओळख, सृजनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत होण्यास मदत होते असे नमूद केले. प्रदर्शनाला शिक्षक, पालक व विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी भेट दिली तसेच विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी प्रदर्शनाला भेट देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सहाय्यक शिक्षक परेश पावसकर तसेच सर्व विषय शिक्षकांनी यांनी विशेष मेहनत घेत प्रदर्शन यशस्वी करण्यास मदत केली.

# सीकेटी विद्यालयात भरतनाट्यम् स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयात संस्थेचे कार्याध्यक्ष, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवानिमित्त शनिवारी (दि.२९) सांस्कृतिक समितीतर्फे जिल्हास्तरीय भरतनाट्यम् स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

भरतनाट्यम् स्पर्धेसाठी संस्थेचे कार्याध्यक्ष लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय टी देशमुख, संस्थेचे संचालक मंडळ सदस्य स्वप्नील ठाकूर, संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, स्वाती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत आसपासच्या शाळा व महाविद्यालयातील एकूण २७ स्पर्धक विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक सहभाग घेऊन आपल्या भरतनाट्यम् या नृत्यकलेचे अप्रतिम सादरीकरण केले. नृत्य कलेचे तंत्र, अभिव्यक्ती, ताल, रंगमंचावरील प्रस्तुती या गुणांच्या आधारे भरतनाट्यम् स्पर्धेचे उत्कृष्ट परीक्षण शिवानी पाचरकर आणि ग्रीष्मा करिया या दोन्ही परीक्षकांनी केले.

स्पर्धेत सर्व स्पर्धकांचे भरतनाट्यम नृत्य अतिशय उल्लेखनीय होते. या स्पर्धेतून सई कदम, इ.११वी कॉमर्स (सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल) हिने प्रथम क्रमांक, रेश्मा श्रीसेंथिल कुमार, इ. ९ वी (लोकनेते रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूल कामोठे) हिने द्वितीय क्रमांक तर अनन्या गडेपल्ली इ.१०वी (डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल) हिने तृतीय क्रमांक पटकावला. मान्यवरांच्या हस्ते या तीनही विजेत्या स्पर्धकांचा रोख बक्षीस रक्कम, ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांनी उत्कृष्ट प्रदर्शन केल्याबद्दल त्यांचाही सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

वाणिज्य विभाग सहशिक्षिका योगिता जोरी यांनी स्पर्धेचे सुंदर सूत्रसंचालन केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात माजी विद्यार्थी संवाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२९) माजी विद्यार्थी संघटनेतर्फे माहिती व तंत्रज्ञान विभागातील माजी विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी संवादाचे आयोजन केले होते.

रवींद्र कुमार या माजी विद्यार्थ्यांने आपला उद्योगातील अनुभव, करिअरमधील आव्हाने आणि संधी याबाबत मार्गदर्शन केले तसेच सध्याच्या उद्योगविश्वात मागणी असलेल्या कौशल्यांवर, प्रोजेक्ट डेव्हलपमेंट, इंटर्नशिप संधी, स्टार्टअप संस्कृती तसेच नोकरी मुलाखतीत मोलाचे ठरणारे तांत्रिक व संवाद कौशल्य यावर भर दिला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देत भविष्यातील करिअरविषयी दिशा दिली. या कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी या सत्रामुळे आपल्या भविष्यातील दिशा अधिक स्पष्ट झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या संवादाचे आयोजन केल्याबद्दल माजी विद्यार्थी संघटना तसेच माजी विद्यार्थी व संघटनेतील इतर सर्व सदस्य, विद्यार्थी यांचे आभार मानले व शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला आयटी विभागाचे प्रमुख, शिक्षकवर्ग आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या संवादाचे आयोजन प्रा. महेश धायगुडे, समन्वयक, माजी विद्यार्थी संघटना यांनी केले तसेच समितीतील इतर सदस्य व कर्मचारी यांनी सहकार्य केले.





**पनवेल : शहरातील ज्वेल्स ऑफ पनवेल इमारतीमध्ये फर्निचरचे नवे ठिकाण म्हणून लेगसी स्टुडिओ या शोरूमचे उद्घाटन शनिवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यास माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक राजू सोनी, भाजप युवा नेते पवन सुनी, भाजप नेते संजय जैन, तसेच प्रतिष्ठित उद्योजक बालचंद्र चोरडिया, पदम् जैन, मुकेश जैन, हार्दिक जैन, दिपेश जैन, संयम जैन आदी उपस्थित होते.**

# सीकेटी मराठी प्राथमिक विभागाच्या क्षेत्रभेटी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या, नवीन पनवेल मधील चांगू काना ठाकूर विद्यालय मराठी प्राथमिक विभागाच्या वतीने शनिवारी (दि.१५) इयत्ता-पहिली दुसरीच्या विद्यार्थ्यांची सिडको उद्यानात व मंगळवारी (दि.२५) इयत्ता-तिसरीच्या विद्यार्थ्यांची पोस्टऑफिस तसेच शुक्रवारी (दि.२८) इयत्ता-चौथीच्या विद्यार्थ्यांची अभ्युदय बँक नवीन पनवेल येथे क्षेत्रभेट देण्यात आली.



इयत्ता-पहिली/दुसरीच्या विद्यार्थांनी सिडको उद्यानात असणाऱ्या वेगवेगळ्या वस्तूंचा काळजीपूर्वक वापर कसा करावा या बाबत शिक्षकांनी मुलांना मार्गदर्शन केले. इयत्ता-तिसरीच्या विद्यार्थ्यांना पोस्टऑफीस चे व्यवहार कसे चालतात? या विषयी तेथील वरिष्ठ पोस्टमास्तर यांनी सविस्तर माहिती दिली. इयत्ता-चौथीच्या विद्यार्थांना बँकेचे व्यवहार कसे चालतात? अशा अनेक प्रकारची माहिती अभिजित काटे यांनी विद्यार्थांना दिली.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक मानकर, सहल प्रमुख मोटे मॅडम, इयत्ता-पहिली, दुसरी, तिसरी व चौथीचे वर्गशिक्षक तसेच शाळेचे शिपाई उपस्थित होते.

# एका बाजूला चुपके चुपके दुसऱ्या बाजूला राजा जानी





## झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

धर्मेंद्र हा कधीच न संपणारा विषय. साठच्या दशकातील कृष्ण धवल अर्थात ब्लॅंक अ‍ॅण्ड व्हाईट चित्रपटातील धर्मेंद्र (दिल भी तेरा हम भी तेरे, बंदीनी, देवर, खामोशी, अनपढ, हकिकत वगैरे)

सत्तरच्या दशकातील मारधाड, ऍक्शन हिरो (यादो की बारात, बदले की आग, राम बलराम इत्यादी)

प्रणय, विनोद, मारधाड, डायलॉगबाजी (शोले, प्रतिज्ञा, द बर्निंग ट्रेन, शालिमार इत्यादी)

आदर्शवादी भूमिका (सत्यकाम नया जमाना दोस्त इत्यादी चित्रपट)

धर्मेंद्रबाबत सांगायचे तर एक माहितीपट तयार होईल. तो ही मेन वा आपल्या पिळदार शरीरयष्टीचे पडदाभर (फूल और पत्थर, साजीश, पाकिटमार इत्यादी चित्रपट) दर्शन घडवणारा रांगडा नायक असेच फक्त आणि फक्त नाही.

त्याच्या तीनशेहून जास्त चित्रपटातील नेमके दोन चित्रपट निवडून त्याचे अष्टपैलूत्व अधोरेखित करणे महाकठीण.

एका बाजूला त्याचा नर्मविनोदी चित्रपट चुपके चुपके आणि दुसरीकडे त्याचा मारधाड ऍक्शन हिरो राजा जानी या दोन चित्रपटांवर फोकस टाकताना भिन्न प्रकारच्या चित्रपटातून धर्मेंद्र प्रभावी ठरल्याचे दिसून येते.

चुपके चुपके बघा,

बेगम इश्क का मजा ही चुपके चुपके से करने मे है

पती के गुण धीरे धीरे पता चलना चाहिए, उसे प्यार धीरे धीरे बढता है...

ऍक्टर क्या है... डायरेक्टर के हाथ की कठपुतली...

जितना बडा जिस्म है, उतना बडा दिल भी दिया है...

क्लायमॅक्स मे पहुंच कर ड्रामा की छुट्टी मत कराव...

गुलजार यांच्या खुसखुशीत, चुरचुरीत, मार्मिक, मिश्किल संवादाने अनेक प्रसंग खुलत, रंगत रंगत हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित चुपके चुपके (मुंबईत प्रदर्शित ११ एप्रिल १९७५) निखळ मनोरंजन करतो, आजही त्यातील प्रसंग आठवले तरी पटकन चेहर्यावर हास्य उमटते. (त्याचीच आजच्या सामाजिक सांस्कृतिक राजकीय वातावरणात गरज आहे) एक स्वच्छ मनोरंजन चित्रपट हे या चित्रपटाचे खास वैशिष्ट्य. धर्मेंद्रचा हा चित्रपट खास उल्लेखनीय ठरतो.अशा कलाकृती कधीच कालबाह्य होत नाहीत. ही मोठीच मिळकत. ओटीटीवर पाहून एन्जॉय करता येईल.

चुपके चुपके. कधीही कोणत्याही दृश्यापासून पहावा, तीच खुमारी. तीच रंगत. असे हलके फुलके मनोरंजन देणारे चित्रपट म्हणजे जणू जवळचे खास मित्रच. पुन्हा पुन्हा असे चित्रपट पहावेत व फ्रेश व्हावे. पन्नास वर्षांपूर्वी मुंबईत न्यू एक्सलसियर चित्रपटगृहात या चित्रपटाने शंभर दिवसांचे यश संपादन केले.

उपेंद्रनाथ गांगुली यांच्या उहहरवेलशीहळ या बंगाली साहित्यवार आधारित छद्मवेश या बंगाली चित्रपटाची रिमेक म्हणजे चुपके चुपके. गुलजार यांचे लेखन व हृषिकेश मुखर्जी यांचे दिग्दर्शन ही गोष्टच चित्रपटाचा क्लास स्पष्ट करते. चित्रपटाची निर्मिती हृषिकेश मुखर्जी व एन. सी. सिप्पी यांची आहे. त्यांनीच आनंद वगैरे अनेक चित्रपट निर्माण केले. चुपके चुपकेचे छायाचित्रणकार जयवंत पाठारे आहेत. हृषिकेश मुखर्जी व जयवंत पाठारे हीदेखील एक दिग्दर्शक व छायाचित्रणकार अशी जमलेली जोडी. त्या काळातील चित्रपटांचे हेदेखील वैशिष्ट्य. (जयवंत पाठारे आमच्या गिरगावातील निकतवरी लेनचे रहिवाशी याचा आम्हाला केवढा अभिमान.) चुपके चुपकेच्या चित्रीकरणाचा खास किस्सा आहे. याचे बरेचसे चित्रीकरण निर्माते एन. सी. सिप्पी यांच्या जुहू येथील बंगल्यात झाले यातही एक विशेष उल्लेखनीय गोष्ट आहेच. याच बंगल्यात आनंद, नमक हराम, चुपके चुपके, सत्ते पे सत्ता या चित्रपटांचे चित्रीकरण झाल्याचा अमिताभ बच्चन यानी गतवर्षी ब्लॉग लिहिला. तोच बंगला अमिताभ बच्चनने खरेदी केल्यावर त्याचे नाव मनसा असे ठेवले होते. काही महिन्यांनी ते नाव बदलून जलसा असे ठेवले. आणि आता मुंबईत असल्यावर प्रत्येक रविवारी अमिताभ याच बंगल्याबाहेर येत आपल्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्यांना आवर्जून दर्शन देतात. (याच बंगल्यात इन्कार इत्यादीचे चित्रीकरण झाल्याचेही दिग्दर्शक राज एन. सिप्पी यांनी एका भेटीत मला सांगितले.)

चुपके चुपके तुम्ही नक्कीच एन्जॉय केला असणार. त्यामुळेच प्रोफेसर परिमल त्रिपाठी अर्थात प्यारे मोहन अलाहाबादी (धर्मेंद्र) आणि प्रोफेसर सुकुमार सिन्हा (अमिताभ बच्चन) यांची मजेशीर जुगलबंदी तुम्ही मनसोक्त मनमुराद अनुभवली आहेच. त्यात त्यांच्या पत्नी शर्मिला टागोर (धर्मेंद्रची) व जया बच्चन (अमिताभ) यांची साथ आहेच. याशिवाय ओम प्रकाश, उषा किरण, लीली चक्रवर्ती, असरानी (हृषिदांच्या चित्रपटातील तो जणू हुकमी), डेव्हिड, विशाल देसाई, नयना आपटे असे अनेक कलाकार याच रंजकतेत भर घालतात.

हृषिदांच्या चित्रपटातील गीत संगीत कायमच उल्लेखनीय. यात आनंद बक्षी यांच्या गीतांना सचिन देव बर्मन यांचे संगीत. चुपके चुपके चल रे (पार्श्वगायिका लता मंगेशकर), सारेगामा (मोहम्मद रफी व किशोरकुमार), बागों मे ये कैसे फूल खिलते है (लता मंगेशकर व मुकेश), अब के सजन (लता मंगेशकर) या गाण्यांचे रुपेरी पडद्यावरील सादरीकरण डोळ्यासमोर येतेच. येथेही दिग्दर्शक दिसतो.

चुपके चुपके या चित्रपटाच्या निर्मितीची प्रक्रिया सुरु होताना त्यात विनोद मेहरा, रेखा, रितेशकुमार, मौशमी चटर्जी यांच्या प्रमुख भूमिका आहेत असे वृत्त होते. रितेशकुमार म्हणजे संगीतकार व पार्श्वगायक हेमंतकुमार यांचा मुलगा व मौशमी चटर्जीचा पती. पण ही केवळ बातमीच राहिली. धर्मेंद्र, शर्मिला टागोर, अमिताभ, जया यांनी हृषिकेश मुखर्जी यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटातून भूमिका साकारण्याचा तोपर्यंत अनुभव घेतला होता. विशेषत: जया बच्चनवर त्यांचा जास्त विश्वास हे सर्वज्ञात. खरं तर, चुपके चुपके पडद्यावर येईपर्यंत धर्मेंद्र ही मॅन (मै तेरा खून पी जाऊंगा) आणि अमिताभ बच्चन अँग्री यंग मॅन (कौन है वो माय का लाल) अशी इमेज झालेली. त्यांनी प्रासंगिक विनोद व शब्द चातुर्याची गंमत असे रसिकांसमोर आणणे व ते स्वीकारले जाणे हे विशेष उल्लेखनीय.

हृषिदांनी आपल्या दिग्दर्शन कारकिर्दीत केवढी तरी विविधता दाखवली आहे. आणि त्यात एक विशेष गोष्ट, हलके फुलके मनोरंजन. त्यांच्या दिग्दर्शनातील बावर्ची, सबसे बडा सुख, चुपके चुपके, गोलमाल, खुबसुरत, नरम गरम, रंग बिरंगी, झूठ बोले कौवा कांटे हे चित्रपट त्या वळणाचे. अंधेरी कुर्ला रोडवरील मोहन स्टुडिओ हृषिदांचा अगदी खास.

...सत्तरच्या दशकातील आणखीन एक विशेष,

त्या दशकातील हृषिकेश मुखर्जी, गुलजार, बासू चटर्जी अशा दिग्दर्शकांचे अनेक चित्रपट तसेच बी. आर. चोप्रा दिग्दर्शित पती पत्नी और वो, रजत रक्षित दिग्दर्शित दामाद अशा अनेक स्वच्छ मनोरंजक चित्रपटांमुळे सर्वांसाठी (युनिव्हर्सल म्हणजे यू) व फक्त प्रौढांसाठी (अ‍ॅडल्स म्हणजे ए) याबरोबरच दर्जेदार (क्वालिटी म्हणजे क्यू) असेही प्रमाणपत्र देण्यात यावे अशीही बरीच चर्चा झाली. पण ती केवळ चर्चाच राहिली. म्हणून काय चित्रपटाचे महत्व कमी होत नाही.

चुपके चुपके मधीलच एक संवाद सांगायचा तर,

जो है वो नही है...और जो नहीं है वो, वो कैसे हो सकता है.

हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित काठी या चित्रपटाचा मुहूर्त आठवतोय. मोहन स्टूडिओत धर्मेंद्रवर मुहूर्त दृश्य चित्रित करण्यात आले होते. चित्रपटात गोविंदा व माधवी यांच्याही भूमिका होत्या. पण चार रिळाच्या चित्रीकरणानतर हा चित्रपट काही कारणास्तव बंद झाला. धर्मेंद्रचा एक सुपर हिट मसालेदार मनोरंजक चित्रपट राजा जानी

कितना मजा आ रहा है...

रत्ना (हेमा मालिनी) रुपेरी पडद्यावर मनसोक्त गातेय आणि तेदेखिल खलपुरुष प्रताप बहादूर सिंग (प्रेम चोप्रा) याला उद्देशून. आश्चर्य वाटतेय? उंचावरील एका अतिशय प्रसन्न अशा गार्डनमध्ये हा अनोख्या 'प्रेमाचा खेळ' रंगलाय आणि राजकुमार सिंग 'राजा' (धर्मेंद्र) व त्याचा साथीदार इमारतीलाल (जॉनी वॉकर) हे आडोश्याला उभे राहून हा सगळा प्रकार पाहताहेत. यावरुन राजकुमार सिंगचा जळफळाट होतोय....(खरं तर गरम धरमने पुढे सरसावत प्रेम चोप्राला बेदम कुटायला हवे. पण तसे होत नाही.)

सिच्युएशन कशी वाटतेय? थीमनुसार ती आहे तर खरंच. पण त्यावरुन फिल्मी कट्ट्यावर छान गप्पा रंगत. प्रेम चोप्राला आपल्या भल्या मोठ्या कारकिर्दीत असा सुखद योग एकादाच. अर्थात 'कहानी की मांग के अनुसार' असे यावर फिल्मी उत्तर असतेच. आणि हा फंडा मदन मोहला निर्मित सेव्हन आर्टस पिक्चर्स या बॅनरखालील मोहन सैगल दिग्दर्शित 'राजा जानी ' (प्रदर्शन ३ नोव्हेंबर १९७२) या म्युझिकल हिट चित्रपटातील.

सुपर हिट चित्रपट काळाला कधी मागे सारतो हे लक्षात येत नाही हेच खरे. सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपट म्हणजे एक प्रकारची घुसळणच होती. त्यात अनेक चटक मटक आपापली स्पेस तयार करीत होता. त्यात एक फंडा गॉसिप्सचा होता. धर्मेंद्र व हेमा मालिनी यांची पडद्यावर छान जमत असलेली जोडी पडद्यामागेही जमलीय/ गुंफत चाललीय या टप्प्यावरचा हा चित्रपट. शराफत (१९७०), तुम हंसी मै जवॉ ( १९७०), नया जमाना (१९७१) यानंतरचा या सुपर हिट जोडीचा 'राजा जानी' हा चित्रपट आणि लगेचच 'सीता और गीता ' (१९७२) ही आलाच. या जोडीने २८ चित्रपटात एकत्र भूमिका साकारली. एक फिल्मी रेकॉर्ड. त्यात 'राजा जानी' त्यांच्या अनेक सुपर हिट पिक्चरमधील एक. यू ट्युबवर एन्जॉय करू शकता.

तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, अनेक सोबर भूमिका साकारत साठच्या दशकात आपली कारकीर्द आकाराला आणलेल्या धर्मेंद्रला ओ. पी. रल्हन दिग्दर्शित 'फूल और पत्थर' ( १९६५) मधील पोस्टरवरील उघड्या निधड्या पिळदार पोझने (या पिक्चरमधील आजारी मीनाकुमारीसोबतची पोझ. अर्थात कहानी की मांग) ॲक्शन हीरोची इमेज द्यायची जणू पेरणी केली. आणि मग कधी सोबर तर कधी देमार भूमिका साकारत साकारत तो पुढे जात राहिला आणि त्यात 'राजा जानी' महत्वाचा. एव्हाना तो कात टाकण्यात यशस्वी ठरलेला. हेमा मालिनीने 'सपनो का सौदागर ' (१९६८) पासून रुपेरी पडद्यावर पदार्पण केले तेच ड्रीम गर्ल म्हणून आणि एकेक चित्रपट करत करत वाटचाल सुरु असताना एक भारी हिट हवाच होता. तो 'राजा जानी' ठरला.

हा चित्रपट Anastasia या अमेरिकन चित्रपटावर आधारित असल्याचे म्हटले गेले. महत्वाचे असते ते त्याला हिंदी चित्रपटाचे रुपडं कसे दिले जातेय. अली रझा यांनी तसे कथा लेखन केले. नबेन्दु घोषने पटकथा लिहिली आणि हा मसालेदार मनोरंजक चित्रपट आकाराला आला.

याचे मध्यवर्ती कथासूत्र असे, राजघराण्याची वारसदार म्हणून राजकुमार सिंग उर्फ राजा (धर्मेंद्र) एका युवतीला त्यानुसार घडवण्याचे आव्हान स्वीकारतो (त्यामागचे खरे कारण चित्रपटाच्या क्लायमॅक्सला सापडते) आणि तो रस्त्यावर नाच काम करणाऱ्या शम्मोची ( हेमा मालिनी) निवड करतो. अशा नाचकाम करणाऱ्या युवतीमध्ये आंतर्बाह्य बदल करणे खूपच आव्हानात्मक असते. ते होत जाताना ती मॉडर्न बनते आणि पटकथा अनेक वळणे घेत घेत रंगत जाते. आता शम्मो रत्ना बनते. आता राजा आणि रत्ना यांची प्रेमकथा. दीवाण गजेंद्रसिंग (प्रेमनाथ) या सगळ्यात कुटील खेळी/डावपेच खेळवतात आणि पिक्चर रंगत जातो.

पिक्चरमध्ये अन्य भूमिकेत जॉनी वॉकर, सज्जन, हेलन, बिंदू, सी. एस. दुबे, सुरेश, मनमोहन इत्यादी. त्या काळात गीत, संगीत व नृत्य मनोरंजनात भर टाकत असे. आनंद बक्षी यांची गीते आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या संगीताने झक्कास स्कोर केला. पिक्चरच्या सुरुवातीलाच जानी ओ जानी ( पार्श्वगायक किशोरकुमार) आणि मग थोड्याच वेळात दुनिया का मेला मेले मे लडकी ( लता मंगेशकर) गाण्यावर हेमा मालिनीचे बेहतरीन नृत्य. पटकथेत गाण्याच्या जागा नेमक्या पेरलेल्या/काढलेल्या आणि पिक्चर पुढे सरकता ठेवण्यात यशस्वी ठरलेल्या. मुबारक हो तुझे ये दिल ( लता मंगेशकर), ए बी सी डी छोडो (लता मंगेशकर), कितना मजा आ रहा है ( लता मंगेशकर), आजा आजा आजा ( लता मंगेशकर) . ही गाणी आजही लोकप्रिय. ए बी सी डी छोडो हे टिपिकल त्या काळातील हिंदी चित्रपटाच्या कल्चरमध्ये फिट्ट बसणारे. त्या काळात नायिका नायकाला पत्र लिहून देई (रामपूर का लक्ष्मणमधील गुम है किसी के प्यार मे). अशा ग्रामीण भागातून आलेल्या नायकाला शुध्द कसे बोलायचे हे शिकवे. ए बी सी डी छोडो गाण्यात नायिकेला आधुनिक करण्यासाठी नायक तिला इंग्लिश शिकवतोय तर ती म्हणते, नैना से नैना जोडो.... धमाल सिच्युएशन आणि पिक्चरमध्ये रंगत.

दिग्दर्शक मोहन सैगल यांची वाटचाल विविध प्रकारचे चित्रपट रसिकांसमोर आणण्याची. त्यामुळे मेकिंगमध्ये तोचतोचपणा येत नाही. न्यू दिल्ली ( १९५६), अपना हाथ जगन्नाथ ( १९६०), करोडपती ( १९६१), देवर (१९६६), कन्यादान ( १९६८), साजन ( १९६९), सावन भादों (१९७०) यानंतरचा त्यांचा 'राजा जानी'. हा चित्रपट.


'राजा जानी' हा त्या काळाला अतिशय फिट्ट बसेल अशा फॉर्मुल्यावरील मनोरंजक चित्रपट. राजघराणे, संपत्तीचा वारसदार, संपत्तीवर एकाद्याची बुरी नजर, कुटील डावपेच आणि मोठा संघर्ष. क्लायमॅक्सला धक्कादायक रहस्याची उकल. या साऱ्याची भक्कम मांडणी महत्वाची. तीच 'राजा जानी'मध्ये जमून आली. अहो, यश दूरवर राहिलचं कसे?आणि यशच कायम लक्षवेधक असते.

धर्मेंद्रच्या तब्बल पासष्ट वर्षांच्या खणखणीत अष्टपैलू वाटचालीतील सर्वाधिक लोकप्रिय चित्रपट सांगायचे तर राजश्री प्रॉडक्शन निर्मित व सत्येन बोस दिग्दर्शित जीवन मृत्यू (१९७०) हा चित्रपट महत्वाचा. मुंबईतील अलंकार चित्रपटगृहात हा चित्रपट मॅटीनी शोला प्रदर्शित झाला आणि पहिल्याच खेळापासून सुपरहिट ठरला. या चित्रपटाने अलंकार चित्रपटगृहात तब्बल १०४ आठवड्याचा खणखणीत मुक्काम केला. राखी गुलजारची भूमिका असलेला हा पहिला चित्रपट आणि आणखीन एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट, मॅटीनी शोला जुने चित्रपट प्रदर्शित व्हायची परंपरा असताना थेट मॅटीनी शोला प्रदर्शित होणारा हा पहिलाच चित्रपट.

धर्मेंद्रच्या अष्टपैलू कारकिर्दीतील हा एक वेगळाच विक्रम. आणि रमेश सिप्पी दिग्दर्शित शोले ची कायमच चर्चा होत असतेच. शोले ला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने याच वर्षी जुहू येथील बंगल्यात धर्मेंद्रची आवर्जून भेट घेऊन त्यांना माझ्या कलेक्शनमधील शोले ची वृत्तपत्रीय जाहिरात, शोलेचे काही फोटो आणि हीच काय चुकले या मराठी चित्रपटात भूमिका साकारलेले फोटो दाखवले असता त्यांनी इतकेच म्हटलं, तस्वीरें बोलती हैं....

भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात धर्मेंद्रचे अनेक वैशिष्ट्यांसह असलेले स्थान कायमच आठवणीत राहिल...

# वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस



सर जगदीश चंद्र बोस यांची आज जयंती. जगदीश चंद्र एक मल्टी-टॅलेंटेड अशे व्यक्तिमत्व होते. ते हे जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ तसेच पुरातत्त्वज्ञ होते. त्यांनी झाडांमध्ये मानव आणि इतर जिवांसारखी संवेदना असते. झाडेही आनंदी, दुखी होतात आणि त्यांनादेखील वेदना होतात हे सिद्ध केले.

जगदीश चंद्र यांनी प्रथम बिनतारी संदेश पाठवणारा यंत्र विकसित केला होता, पण या यंत्राचे श्रेय त्याना मिळाले नाही. आजची मॉडर्न वायरलेस टेकनॉलॉजी त्या अविष्कारावर आधारलेली आहेत, त्यांनी नेमेलाइट रेझोनंट रेकॉर्डर, ऑसिलेटिंग रेकॉर्डर, कंपाऊंड लेव्हलर, क्रेसकोग्राफ, बॅलिन्सिंग ॲपरेट्स आदी उपकरणे तयार केली.

पूर्व बंगालमधील डाक्का जिल्ह्यातील राणीखल या खेडेगावात ३० नोव्हेंबर १८५८ रोजी जगदीशचंद्र बोस यांच्या जन्म झाला. त्यांचे वडील भगवानचंद्र बसू हे सरकारी नोकरीत सबडिव्हिजनला ऑफिसर होते. त्या काळी इंग्रजीत जसे ठाकूरचे टागोर झाले, राय आडनावाचे रे झाले तसेच बसू आडनावाचे इंग्रजी स्पेलिंग बोस झाले.

१८८५ साली त्यांनी लंडन विद्यापीठाची डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी प्राप्त केली. याबरोबरच सृष्टिविज्ञान विषयातील ट्रायपॉस ही पदवी मिळवून ते भारतात परतले. भारतात परतल्यानंतर ते कलकत्ता येथील प्रेसिडेन्सी महाविद्यालयात पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक म्हणून कार्य करू लागले. हे उच्चपद धारण करणारे ते पहिले भारतीय होते. काही काळानंतर आपले बिनतारी लहरींचे प्रयोग पुढे नेत असताना बोसना काही विलक्षण गोष्टी सापडल्या. धातूच्या वस्तू बिनतारी लहरींना आपल्याकडे आकर्षून घेतात त्याच पद्धतीनं जीवसृष्टीमधल्या सजीव गोष्टींनासुद्धा त्यांचं अस्तित्व जाणवतं असं त्यांच्या लक्षात आलं.

बोस यांनी आपल्या निरीक्षणांविषयी सात शोधनिबंध लिहून ते रॉयल सोसायटीकडे पाठवले. पण काही काळानं बोस यांच्या संशोधनाविषयी विनाकारण संशय निर्माण करणं तसंच त्यांच्या संशोधनाचं श्रेय स्वत:च लाटायचे प्रयत्न करणं असे प्रकार काही जणांनी सुरू केले. त्यामुळे स्वत:ची इच्छा नसूनही बोस यांना आपल्या संशोधनाविषयी एक पुस्तक लिहिणं भाग पडलं. १९०२ साली 'रिस्पॉन्स इन द लिव्हिंग अँड नॉन-लिव्हिंग' या नावानं ते प्रसिद्ध झालं.

बोस यांची शास्त्रज्ञ म्हणून जगभर ख्याती पसरली. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रॉयल सोसायटीचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. या पदासाठी निवड झालेले ते पहिले भारतीय शास्त्रज्ञ ठरले. त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचे मोल लक्षात घेऊन ब्रिटिश शासनाने इ.स. १९१७मध्ये त्यांना 'सर' या किताबाने सन्मानित केले. तेव्हापासून ते 'सर जगदीशचंद्र बोस' या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांचे समकालीन भारतीय वैज्ञानिक सी.व्ही. रामन यांच्यापेक्षा बोस ३० वर्षांनी मोठे होते. योगायोग असा की, रामन ज्या वित्तीय प्रशासकीय सेवेच्या परीक्षेस बसले होते, त्या परीक्षेतील पदार्थविज्ञान विषयाची प्रश्नपत्रिका बोस यांनी तयार केली होती. आपल्या मृत्यूच्या एक दिवस आधी बोस यांनी तयार केली होती. २३ नोव्हेंबर १९३७ रोजी बिहारमधील गिरिडीह येथे बोस यांची प्राणज्योत मालवली.

(साभार: इंटरनेट)

# कवी बा.भ. बोरकर



बाळकृष्ण भगवंत बोरकर हे बा.भ. बोरकर नावाने ख्यातनाम होते. त्यांची कवी, कथाकार, कादंबरीकार व अनुवादक अशी अनेक रूपे मराठी साहित्याला पाहायला मिळाली.

कवी बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९१० कुडचडे या गोव्यातील गावी, त्यांच्या आजोळी झाला. बोरी त्यांचे मूळ गाव. त्यांचे शिक्षण मराठी तीन इयत्तांपर्यंत, इंग्रजी मॅट्रिकपर्यंत, पोतुगीज माध्यमिक आणि टीचर्स डिप्लोमा, असे झाले होते. १९३० ते १९४५ सालांपर्यंत गोव्यातील निरनिराळ्या शाळांत त्यांनी अध्यापन केले. त्यानंतर १९४६ साली त्यांनी गोवा स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. 'आमचा गोमंतक' (मराठी) आणि 'प्रजेचो आवाज' (कोंकणी) या नियतकालिकांचे त्यांनी १९४८ व १९५५ साली संपादन केले. १९५५-१९७० आकाशवाणी पुणे व पणजी केंद्रांवर वाङ्मय विभागाचे संचालन केले.

कवितेला बा.भ. बोरकरांनी 'लययोगाची हृदयंगम कला' असे म्हटले आहे. म्हणूनच 'रसोत्सवी खोल' बुडून कवीने 'जरेतदेखील माती माझी कशी तयांची धरिते ओल' असा प्रश्न केलेला आहे. मग त्यांची कविता विराग-अनुराग, रती-विरक्ती अशा द्वंद्वांतून प्रेमसोपानाच्या वाटेने शिवत्वाला जाऊन भिडते.

कवी बोरकरांच्या काव्यप्रवासाच्या उत्तरार्धात रसप्रसन्नता व भारतीय संस्कृतिसंचितात पाय घट्ट रोवून उभे राहण्याची प्रतीती प्रकटलेली आहे. 'चिन्मयी'मध्ये माती व ज्योतीची सांगड आणि कृतार्थता यांचे दर्शन आहे.'मेघदूताच्या अनुवादात साक्षात्कारी प्रत्यय आहे, तर 'कांचनसंध्या' व 'अनुरागिणी' प्रेमनिसर्गयोगी बनून देहभानापल्याड जाता, जाता शाश्वताचे भान आणि रसमय जीवनवृत्तीचा कृतज्ञ स्वीकार दिसतो. 'महात्मायन' पूर्ण झाले नाही आणि कवितेत जे जसे साधले ते कथालेखन, कादंबरीलेखन व ललितगद्यात साधले नाही.

'प्रिय-कामा' मध्ये रामायणातील कैकेयीकडे बघताना त्यांनी पुराणाला आधुनिकतेचा स्पर्श दिला.बोरकरांनी ज्या हिंदी कविता रचल्या, त्यांबद्दल ग.दि. माडगूळकरांनी 'तीळ आणि तांदूळ' या ललितलेखनसंग्रहात नोंदवून ठेवलेले आहे. त्यातही 'अध्यात्माची आलापी' होती, असे माडगूळकर सांगतात.

त्यांची कविता गुणगुणतच जन्माला आली. तिने अरूप, अशब्द अनुभवांना निसर्गभाषेतून साकार केले. कवी तांब्यांच्या दृष्टीचा दिवा करूनही आत्मत्वाच्या बळाने त्यांनी वाटचाल केली आणि निसर्गप्रतीतिधर्मी हीच आपली पृथगात्मता सिद्ध केली; जिचा गाभा गीतात्मता हाच होता. ८ जुलै १९८४ रोजी त्यांचे निधन झाले.

बोरकरांच्या जीवनप्रवासाचे खरे वर्णन त्यांच्याच शब्दांत करायचे झाले तर म्हणावे लागेल :

'नाही पुण्याची मोजणी, नाही पापाची टोचणी जिणे गंगौघाचे पाणी.'

-डॉ. आशा सावदेकर

# महाडमध्ये वाहतूककोंडीत वाढ

## नगर परिषद व पोलीस प्रशासनाने समन्वयाने उपाययोजना गरजेची

**महाड : प्रतिनिधी**

राज्यभरातून शालेय सहलींचा हंगाम सुरू झाल्याने ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या महाड शहरात विद्यार्थ्यांच्या सहलींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र या वाढत्या सहलींसोबत शहरातील वाहतूककोंडीचा प्रश्नही अधिक तीव्र होत असल्याचे सातत्याने निदर्शनास येत आहे. विशेषत: सहलींसाठी येणाऱ्या एसटी . व खाजगी आराम बसेस आणि खाजगी पर्यटन वाहनांमुळे शहरातील मुख्य मार्गावर सतत वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र निर्माण होत आहे.



महाड शहरातील चवदारतळे परिसरात वाहतूककोंडीचा सर्वाधिक फटका बसत असून, सायंकाळी व सकाळी महत्त्वाच्या वेळेत वाहने ये जा करीत असताना ही परिस्थिती अधिकच बिकट होत असल्याचे स्थानिक नागरिकांकडून वारंवार याबाबत प्रशासनाला सूचना दिल्या आहेत.

भारताच्या सामाजिक चळवळीतील ऐतिहासिक टप्पा ठरलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाण्याच्या सत्याग्रहाचे स्थळ म्हणून चवदारतळयाला मोठी ऐतिहासिक महत्ता आहे. एकता, समता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या या स्थळाला पाहण्यासाठी राज्यातील तसेच देश विदेशातून शाळा, महाविद्यालये व संघटनांच्या सहली मोठ्या प्रमाणात महाडमध्ये दाखल होत आहेत.

याशिवाय किल्ले रायगड, शिवथरघळ, तसेच इतर ऐतिहासिक आणि प्राचीन स्थळांसाठीही महाड हा प्रवेशद्वार असल्याने वाहतुकीवरील ताण सातत्याने पडत आहे

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून चवदारतळ्याकडे जाणाऱ्या मार्गावर कोणतीही सुसूत्र पार्किंग व्यवस्था नाही. त्यामुळे खाजगी वाहनांची रस्त्याकडेला बेशिस्त पार्किंग मोठ्या प्रमाणात दिसून येते. परिणामी आंबेडकर चौक परिसरात सहलींच्या बसेस अडकल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. या ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नियुक्त नसल्याने नागरिक, व्यापारी आणि वाहतूकदारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

महाड नगरपरिषदेच्या हद्दीत कोठेही अधिकृत, नियोजित पार्किंगची व्यवस्था नसल्याने शहरातील वाहतूक समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. सध्या दिवसाला २० ते२५ एसटी बसेस सहलींसाठी महाडमध्ये दाखल होत आहेत,

मात्र हंगाम वाढला की हा आकडा दुप्पट होण्याचीही शक्यता आहे. त्यानुसार उपाययोजना न झाल्यास वाहतूक सुस्थितीत ठेवणे प्रशासनाला अशक्य होईल, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

महा शहरातील सर्वच ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत प्रशासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने नाराजी वाढत आहे. नागरिक आणि वाहतूकदार संघटनांकडून,

नगरपरिषद व पोलीस प्रशासनाने एकत्रितपणे समन्वय साधून योग्य धोरण अवलंबावे आणि वाहतुकीची समस्या तातडीने दूर करावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

शहरात असणाऱ्या शासकीय व खाजगी बँकां या ठिकाणी आहे त्या ठिकाणी पार्किंग व्यवस्था नसल्याने मोठ्या प्रमाणावर त्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते यातून बँक व्यवस्थापनाने स्वतःचे खाजगी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून वाहतूक कोंडीतून मार्ग काढणे गरजेचे आहे मात्र वाहतूक कोंडीबाबत नगरपालिका प्रशासन कारवाई करायचे नाव देत नसल्याने मोठ्या प्रमाणे वाहतूक कोंडी तर निर्माण होत आहे.

# अशोकदादा साबळे उद्यानातील स्वराज्याची शपथ शिल्पाकृतीची स्वच्छता दुर्लक्षित

**माणगांव : बातमीदार**

माणगांव तलाठी भवन शेजारील अशोक दादा साबळे उद्यान येथील महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याची शपथ विधी दर्शविणारी सुंदर बोधात्मक शिल्पाकृतीच्या प्रतिमेस अनावश्यक रानं झाड, वेलींनी घेरले, स्वच्छता दुर्लक्षित झाली होती.



अलिकडे छत्रपतींच्या नावाचे नुसतेच राजकारण करुन आपला स्वार्थ साधला जातो पण आपला जाणता राजा त्यांच्या स्मृती स्थळांचे पावित्र्य राखणे हे आपले नागरिकांचे आद्य कर्तव्य आहे. अनावधानाने माणगांव मधिल उद्यानातील ही परिस्थीती याकडे कोणाचे लक्ष नव्हते ही दुर्लक्षित गोष्ट अनिकेत कांबळे या युवा सुज्ञ नागरिकाने लक्षात आणुन दिली.

माणगांव नगरीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांचे निदर्शनास ही बाब आणून देताच तात्काळ दुसर्याच दिवशी दखल घेत येथे आपल्या सफाई कर्मचाऱ्यांस पाठवून येथील सुंदर शिल्पाकृतीची सफाई करुन घेतली. जिथे कुठे अशी आपली प्रेरणास्थानं असतिल त्यांचे पावित्र्य राखणे माणगांवकर म्हणुन आपली सर्वांचीच जबाबदारी नव्हे आद्य कर्तव्यच आहे.

या ऐतिहासिक शिल्पाकृती जिथे कुठे असतील त्या आपले दीपस्तंभ आहेत त्यांचे पावित्र्य राखले गेलेच पाहीजे हे मात्र निश्चित.

# निलज येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव :** लायन्स क्लब ऑफ माणगाव, लायन्स हेल्थ फाऊंडेशन आणि ग्रामपंचायत निलज यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत निलज ग्रामपंचायत कार्यालय येथे शुक्रवार, दि. २८ रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू, शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात अनेक रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र रुग्णांची नोंदणी करून त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी निलज सरपंच उपस्थित होते.

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ समाजकार्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या कौशल्य व उद्योजकता विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जानेवारी २०२६ पासून समाजकार्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम ( सी सी एस डब्लू) हा ६ महिने कालावधीचा अभ्यासक्रम सुरू होत आहे.

या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रियेस १ डिसेंबर २०२५ पासून सुरुवात होतआहे. अभ्यासक्रमाचे प्रवेश शुल्क ५९१० रुपये आहे. किमान १० वी उतरण व त्या पुढील कोणत्याही शाखेतील शैक्षणिक पात्रता असणाऱ्या समाजातील प्रत्येक स्तरातील प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यल्प प्रशिक्षण शुल्कात एक रकमी फी भरून ॲडमिशन घेणे सोपे जाणार आहे. सदर व्यवसाय प्रशिक्षण वर्गात समाजकार्य संकल्पना, सामाजिक संरचना, सामाजिक समस्या, गट कार्य, व्यक्ती सहाय्यक कार्य, शासकीय योजना, सामाजिक संस्थांच्या भूमिका,संप्रेषण कौशल्य, नेतृत्व कौशल्य, क्षेत्र कार्य, वैयक्तिक कार्य अशा अनेक समाज उपयोगी तंत्र व कौशल्यांचा अभ्यास सदर समाजकार्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम विषयात विद्यार्थ्यांना करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

जन शिक्षण संस्थान रायगडच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, संचालक विजय हिरामण कोकणे, उपाध्यक्ष सौ. रत्नप्रभा बेल्हेकर व्यवस्थापक मंडळ, त्याचबरोबर टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या उपाध्यक्ष डॉ प्रणती टिळक, सचिव अभिजीत खाडीलकर, समाजकार्य विभाग समन्वयक सौ. स्मिता वारघडे यांच्या विशेष मार्गदर्शनातून, समन्वय करार व परस्पर सहकार्यातून सदर प्रेरणादायी उपक्रम वाडी,वस्त्या,ग्रामीण, शहरी, व दुर्गम आदिवासी भागातील लाभर्त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्याच्या व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टिकोनातून सदर उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

हे शिक्षण प्रशिक्षण जन शिक्षण संस्थान रायगड सहाण–अलिबाग ह्या ठिकाणी पहिल्या–वहिल्या रेजिस्ट्रेशन व ट्रेनिंग सेंटरच्या माध्यमातून रायगड व महाराष्ट्र वासियांना १० वी नंतर चा एक दर्जेदार अभ्यासक्रम प्रत्यक्षात शिकण्याची सुविधा व सुवर्णसंधी प्राप्त होणार आहे. आठवड्यातून २ दिवस शुक्रवार व शनिवार अलिबाग येथे व आठवड्यातून १ दिवस विद्यार्थ्याच्या नजीकच्या सामाजिक संस्थेत क्षेत्र कार्य म्हणून असे ३ दिवस सकाळी १०.०० ते सायंकाळी ०४.०० या वेळेत शिक्षण व प्रशिक्षण घ्यावे लागणार असून विद्यार्थ्यांना किमान ८० टक्के प्रत्यक्ष उपस्थिती बंधनकारक असणार आहे. विद्यार्थ्यांकरिता दर्जेदार प्राध्यापकांच्या माध्यमातून प्रशिक्षण व सुलभ भाषेतील नोट्स पुस्तिका मराठी भाषेत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यशस्वीरित्या अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेअंती टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व जे.एस.एस रायगड यांच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने भारत सरकार पुरस्कृत प्रमाणपत्र देखील प्राप्त होतील . अधिक माहिती साठी संपर्क साधा प्रकल्प समन्वयक सौ प्रतीक्षा सचिन चव्हाण भांदुर्गे ०९०९६६७०३६९ , ०९९२२९९२९७२ ०९९२२९९२९७२, ०९८१९८५४३०८ जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक विजय हिरामण कोकणे ९८१९८५४३०८, ९९२२९९२९६२ यांच्याशी संपर्क साधावा.

# रेवदंडा मोठा कोळीवाडा श्री खंडेराय मंदिरातील मुर्तीची चोरी

**रेवदंडा: प्रतिनिधी**

रेवदंडा मोठा कोळीवाडा येथील श्री खंडेराय मंदिरातील चांदीच्या मुर्तीची चोरी झाल्याची घटना घडली असून रेवदंडा पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे, मात्र त्यास अटक करण्यात आलेली नाही.



रेवदंडा मोठा कोळीवाडा येथील श्री खंडेराय मंदिरात दि. २१ नोव्हेबर रोजी रात्री १०.०० ते दि. २२ नोव्हेबर रोजी सकाळी ५.३० चे दरम्यान थेरोंडा येथील सराईत गुन्हेगार महेश नंदकुमार चायनाखवा यांने प्रवेश करून मंदिरातील देव्हाऱ्यातील १०० ग्रॅम वजनाची रूपये ६ हजार किमंतीचे खंडोबा देवाची चांदीची मुर्ती, १०० ग्रॅम वजनाची ६ हजार रूपये किमंतीची भैरवनाथ देवाच्या चांदीची मुर्ती, १०० ग्रॅम वजनाची रूपये ६ हजार किमंतीची कुलस्वामीनी देवीची चांदीची मुर्ती, १०० ग्रॅम वजनाची रूपये ६ हजार किमंतीची महिसासुरमरदिनी देवीची चांदीची मुर्ती,१०० ग्रॅम वजनाची रूपये ६ हजार किमंतीची वाघजाई५ देवीची चांदीची मुर्ती,५०० रूपये किमंतीची गणपतीची चांदीचा मुलामा दिलेली धातूची मुर्ती, असे एकूण ३० हजार ५०० रूपयांचा ऐवज चोरीस गेल्याची तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे मोठा कोळीवाडा ग्रामस्थ हेमंत गुंडा यांनी दिली आहे.

रेवदंडा पोलिसांनी या चोरी तपासात सराईत गुन्हेगार थेरोंडा येथील महेश चायनाखवा यांचेवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ ड नुसार गुन्हा दाखल केला आहे. मात्र आरोपीस तपासासाठी ताब्यात घेतले असून अदयापी अटक केली नसल्याचे रेवदंडा पोलिसांकडून सांगण्यात येते. रेवदंडा पोलिस ठाण्याचे पोसई गांगुर्डे पुढील तपास पोलिस ठाणे इन्चार्ज सपोनि श्रीकांत किरविले यांचे मार्गदर्शनाखाली करत आहेत.

# सुधागड तालुक्यात बिबट्याची दहशत, परिसरात तीन पाळीव जनावरांचा बळी

**पाली: प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात नागशेत व कोशिंबळे परिसरात बिबट्याने पाळीव जनावरांवर हल्ले करून दहशत निर्माण केली आहे. दाट जंगलाला लागून असलेल्या या गावांमध्ये गेल्या काही दिवसांत बिबट्याने तिन जनावरांची हत्या केली असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बिबट्याने दोन दुभत्या गाई आणि एका वासराचा बळी घेतला. यापूर्वीही याच परिसरात म्हैस ठार मारल्याची घटना नोंदवली होती. हल्ल्याचे ठिकाणे जंगलाच्या कडेला असलेली गोठ्यांची वस्ती असल्याने बिबट्याचे वारंवार दर्शन आणि आवाज यामुळे ग्रामस्थ रात्रभर जागरण करीत आहेत व पहारा देत आहेत.

बिबट्याच्या जनावरांवरील हल्ल्याच्या बाबतीत शेतकऱ्यांनी वनविभागाला कळविले. त्यानंतर लगेचच सुधागड वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे, वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी उमेश जंगम, अनुभवी वनपाल उत्तम किसनराव शिंदे, वनरक्षक समाधान कुटे, पाच्छापूर वनरक्षक सायली महाडिक, पशुधन अधिकारी म्हसकर आणि नांदगाव विभागीय पशुवैद्यकीय अधिकारी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

शेतकऱ्यांचे झालेले नुकसान तातडीने भरून निघावे म्हणून परिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे यांनी संबंधित कागदपत्रांसह भरपाईचा प्रस्ताव अलिबाग वनविभागाकडे पाठविला आहे. संबंधित शेतकऱ्यांना शासनाच्या नियमांनुसार लवकरच भरपाई मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले. वनविभागाने ग्रामस्थांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. रात्री अनावश्यक घराबाहेर न पडणे, जनावरे सुरक्षित जागी बांधणे व काही हालचाल आढळल्यास त्वरित कळविण्याचे निर्देश दिले आहेत.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतीमालमत्ता ही पोट तुकडी रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती उरण आणि ग्रामपंचायत कोप्रोली यांच्या हद्दीत खालीलप्रमाणे आहे:

| गावाचे नाव | सर्वे नंबर क्षेत्र (हे.आ.) | खराबा क्षेत्र (हे.आ.) | एकूण क्षेत्र (हे.आ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|---|
| कोप्रोली | १३६/१ | ०.०२.८० | ०.१९.२० | २.२५ |

शेतकऱ्यांची नावेः
१. श्री. संदिप जयवंत पाटील

वरील नमूद केलेली मालमत्ता ही वंशपरंपरागत व कर्जविहीन स्वरूपात संबंधित मालकांच्या मालकी हक्कात असून त्यांनी सदरहू मालमत्ता कायमस्वरूपी विक्री करण्यास संमती दर्शविली आहे. सदरहू मालमत्ता ही निर्बंधमुक्त व बाजारहट्ट स्वरूपाची असल्याचे विद्यमान मालकांनी स्पष्ट केले आहे.

जर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेला या मालमत्तेवर कोणताही कायदेशीर हक्क, दावे, गहाण, भाडेकरार, खरेदी–विक्री, वारसाहक्क, वसीयत, बँकेचे कर्ज, बंधपत्र, दान, जामीन, टाकावा, खटला, लीज, ट्रस्ट, करार, बंधन, किंवा कोणत्याही स्वरूपाचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत **खाली सही करणाऱ्या अग्रवाल डेव्हलपर्स यांच्याकडे** लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करावा.

ठरवलेल्या मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास, वरिल मालमत्ता ही पूर्णपणे निर्बंध व वादविवादमुक्त समजली जाईल व कोणालाही कोणताही कायदेशीर हक्क किंवा हितसंबंध उरलेला नाही असे गृहित धरण्यात येईल.

तसेच, यानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत अथवा वंशपरंपरागत दावा आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. ही बाब सर्वांच्या लक्षात घेण्यात यावी.

**दिनांक : २९/११/२०२५**
**स्थळ : उरण, रायगड**

**सही/–**
**बिनोद अग्रवाल**
**अग्रवाल डेव्हलपर्स**
**खोपटा उरण रोड, सतीश कॉम्प्लेक्स,**
**कोप्रोली – ४००७०२**
**मोबा. : ९८३३४२५०७५**

# बाहेरील कार्यकर्ते व नेत्यांना नगर परिषद हद्दीत नो एंट्री

**खोपोली : प्रतिनिधी**

जिल्ह्यात दहा नगरपरिषदेच्या निवडणूक प्रचाराची सांगता ३० नोव्हेंबर रोजी होत असून त्यानंतर बाहेरील कार्यकर्ते व नेते यांना नगरपरिषद हद्दीत पूर्णवेळ उपस्थित राहता येणार नाही असे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बजावले आहेत. रायगड जिल्ह्यातील नगरपरिषद हद्दीमध्ये मंगळवार २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. निवडणूकीच्या मतदान समाप्तीकरीता निर्धारित केलेल्या वेळेच्या ४८ तास अगोदर प्रशासनाकडून पूर्ण खबरदारी घेण्यात येणार आहे. पाच पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास किंवा फिरण्यास मनाई करण्यात आली आहे. समाज माध्यमावर राजकीय प्रचाराच्या संदेशावर देखील प्रशासनाचे लक्ष असणार आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस शस्त्र घेवून जाण्यास मनाई आहे. अपवाद मतदान केंद्राच्या सुरक्षेकरिता नियुक्त केलेले अधिकारी ,कर्मचारी, ज्या व्यक्तीस एसपीजी किंवा झेडप्लस दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आली आहे अशा व्यक्तीस साध्या वेशात एक सुरक्षा रक्षक शस्त्र लपवलेल्या स्थितीत घेवून जाता येणार आहे. मतदान केंद्राच्या शंभर मीटर परिसरात आस्थापना चालू ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे.

***नगरपरिषद हद्दीत नो एंट्री.*** *प्रचार कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघाचे मतदार नाहीत असे राजकीय कार्यकर्ते,पक्ष कार्यकर्ते, मिरवणुकीतील कार्यकर्ते ,प्रचार कार्यकर्ते, इत्यादींना नियमितपणे मतदारसंघामध्ये उपस्थित राहता येणार नाही.*

# शिघ्रे येथे अमली पदार्थ व तंबाखूमुक्त भारत जनजागृतीसाठी पथनाट्य सादर



अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड–जंजिरा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित सात दिवसीय विशेष निवासी शिबिराअंतर्गत आज दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी 'अमली पदार्थ व तंबाखूमुक्त भारत' जनजागृतीसाठी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले.

हे पथनाट्य शिघ्रे पोलिस चौकी, शिघ्रे मार्केट आणि जिल्हा परिषद शाळा येथे सादर करण्यात आले. या पथनाट्याद्वारे अमली पदार्थांचे दुष्परिणाम, तंबाखूमुळे होणारे आरोग्यधोके आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी युवकांचे योगदान याबाबत स्वयंसेवकांनी जागृतीपर संदेश दिला.'अमली पदार्थाला नकार – सुंदर जीवनाचा स्वीकार' या प्रभावी संदेशावर आधारित या पथनाट्यास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महाविद्यालय विकास समिती सदस्य तौसीफ फत्ते हे सुद्धा आवर्जून उपस्थित होते. या पथनाट्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, प्रा. स्वालिहा कादिरी, तसेच समिती सदस्य प्रा. अल्ताफ फकीर यांनी विशेष परिश्रम घेतले. या पथनाट्यात फातिमा जमादार, सानिया खातिब, प्रेमसागर सोनवणे, मसीरा कादिरी, इकरा कर्वारी, सलवा फत्ते आदी शिबिरार्थींनी उत्कृष्ट भूमिका साकारल्या

### निवडणूक निर्णय अधिकारी, उरण नगरपरिषद

**सार्वत्रिक निवडणूक २०२५ यांचे कार्यालय उरण,**
**ता.उरण, जिल्हा–रायगड पिन कोड –४०० ७०२**
Email-municipalcounciluran@gmail.com

जा.क्र./ उनप/सा.नि.२०२५/ एक खिडकी/०३१०/२०२५ — दिनांक:–२९/११/२०२५

### जाहीर सुचना

उरण नगरपरिषद हद्दीतील सर्व राजकीय पक्ष, राजकीय पक्षाचे उमेदवार, सर्व पत्रकार बांधव तसेच नागरिक यांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचेमार्फत आदेश क्र. रानिआ/जिपपंस–२०२५ प्र.क्र.४२/का.७, दिनांक ०४/११/२०२५ अन्वये निर्गमित केलेले आचारसंहिता एकत्रित आदेश नुसार उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदान सुरु होण्याच्या दिनांकाच्या २४ तास अगोदर म्हणजे ३० तारखेला रात्री १२ नंतर प्रचार बंद ठेवण्याचे आदेश होते. मात्र ३० तारखेला रात्री १० नंतर सभा/मोर्चे/ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नसलेचे तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिद्धी/प्रसारण देखील बंद ठेवण्याचे आदेश होते. तथापि मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचेमार्फत आदेश क्र. रानिआ/जिपपंस–२०२५ प्र.क्र.१७/का. ६ दिनांक २७/११/२०२५ अन्वये जाहीर प्रचारबंदीच्या कालावधीबाबत सुधारित आदेश पारित करण्यात आले. सदर आदेशानुसार मतदान सुरु होण्याच्या दिनांकाच्या अगोदरच्या दिवशी म्हणजेच १ तारखेला रात्री १० वाजता प्रचार बंद होईल व त्या वेळेपासून सभा/ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिद्धी/प्रसारण देखील बंद होईल याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**

**ठिकाण : उरण**

# नवी मुंबईत वायू प्रदूषण रोखण्याला प्राधान्य

## बांधकाम साईट्सवर महापालिकेकडून प्रत्यक्ष तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या थंडीच्या कालावधीत प्रकर्षाने जाणवणारे हवेतील धुरक्याचे वाढलेले प्रमाण लक्षात घेत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक काटेकोर व प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत दिले होते. त्यामध्ये प्रामुख्याने शहरात सुरू असलेल्या बांधकाम साईट्सवर धूळ प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपरणे राबविल्या जात असल्याची प्रत्यक्ष पाहणी करून खात्री करण्याचे निर्देश नगररचना विभागास दिले होते. तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळल्यास साईटवरील बांधकाम आठवडयाभरासाठी बंद करावे, असे निर्देशित केले होते.

त्यास अनुसरून सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांच्या नियंत्रणाखाली नगररचना विभागातील अभियंते आणि विभाग कार्यालयातील अभियंते यांना बांधकाम साईट्सची क्षेत्रे नेमून देण्यात आली असून त्याठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन वायू व ध्वनी प्रदूषण विषयक उपाययोजना व्यवस्थितरित्या राबविल्या जात असल्याची खातरजमा केली जात आहे. अशाच प्रकारे विभाग कार्यालय



स्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या पथकांव्दारे दगडखाणी, सिमेंट निर्मितीचे आरएमसी प्लान्ट, कोळशाचा वापर करणाऱ्या बेकरी व तंदूर भट्ट्या यांचीही तपासणी करण्यात येत आहे. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम प्रकल्पांदरम्यान होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल केलेल्या जनहित याचिकेमध्ये दिनांक ११ डिसेंबर २०२३ रोजी आदेश पारित करून बांधकाम स्थळांवरील प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

उच्च न्यायालयाचे आदेश व नागरिकांकडून प्राप्त तक्रारी विचारात घेऊन, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मान्यतेने मानक कार्यप्रणाली तयार करण्यात आली असून १ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या मानक कार्यप्रणालीनुसार सर्व बांधकाम साईट्सवर धूळ, ध्वनी व वायू प्रदूषणरोधक उपाययोजना करणे अनिवार्य आहे.

### मानक कार्यप्रणालीचे निर्देश

सर्व उपाययोजना नवी मुंबई महानगरपालिकेच्या मानक कार्यप्रणाली नुसार काटेकोरपणे पालन करणे सर्व विकासक, बांधकाम व्यावसायिक, कंत्राटदार आणि प्रकल्प प्रवर्तक यांच्यासाठी अनिवार्य आहे, तरी दंडात्मक कारवाई तसेच 'काम बंद' कारवाई टाळण्यासाठी सर्व विकासक, बांधकाम व्यावसायिक, कंत्राटदार आणि प्रकल्प प्रवर्तक यांनी 'मानक कार्यप्रणाली' मधील उपाययोजनांची त्वरित अंमलबजावणी करावी, असे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सूचित करण्यात येत आहे.

संरक्षक कुंपण : संपूर्ण बांधकाम क्षेत्राभोवती किमान २० फूट उंचीचे लोखंडी पत्र्याचे कुंपण उभारणे. धूळ नियंत्रणासाठी फॉगिंग आणि स्प्रिंकलर प्रणाली : बांधकाम स्थळी नियमितपणे फॉगर्स आणि स्प्रिंकलर्सचा वापर करून धूळ कमी करणे. वाहनांच्या चाके धुण्याची व्यवस्था: बांधकाम साईटमध्ये आगमन, निर्गमन होताना वाहनांची चाके धुणे अनिवार्य आहे.

सीसीटिव्ही कॅमेरे बसविणे: बांधकाम साईटवर सीसीटिव्ही कॅमेरे बसवून नियमांचे पालन नोंद करणे. पदपथ व सार्वजनिक रस्ते स्वच्छ ठेवणे: बांधकाम साईटच्या बाहेरील पदपथ व रस्त्यांवर धूळ साचू नये यासाठी नियमित स्वच्छता करणे.

साईटवरील साहित्य झाकून ठेवणे: वाळू, सिमेंट, क्रश मटेरियल यांसारखे धूळकट साहित्य ताडपत्रीने झाकून ठेवणे. डीजी सेटसाठी ध्वनीरोधक व्यवस्था: जनरेटर सेटसाठी सायलेन्सर व ध्वनीरोधक कवच बसविणे. बांधकाम कचरा व पाडकाम कचरा व्यवस्थापन: बांधकामातील अवशेष व मलबा याची अधिकृत ठिकाणीच विल्हेवाट लावणे. कामकाजाचे वेळापत्रक: ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी नेमून दिलेल्या वेळेतच बांधकाम करणे.

# मच्छी मार्केटचा भूखंड मनपास हस्तांतरीत करा -दशरथ भगत

## सिडकोकडे मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

वाशीगाव व सेक्टर ३१ परिसरातील नागरिकांना भाजी, मासळी व अन्य दैनंदिन खरेदीसाठी राखीव असलेला मार्केटचा भूखंड सिडकोने नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत करावा, अशी मागणी महापालिकेचे विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांनी पुन्हा एकदा पत्राद्वारे केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासुन तत्कालीन नगरसेवक दशरथ भगत यांनी अनेक पत्राद्वारे सिडको व महापालिका प्रशासनाकडे या मार्केटसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर दैनंदिन बाजारासाठी मार्केटच्या वास्तुसह सामाजिक उपयोजन होईल अशी बहुउद्देशीय वास्तू निर्माण करावी, अशी मागणी लावून धरलेली आहे.

सन २०२२ साली जानेवारीत महापालिकेच्या शहर विकास आराखड्यात देखील सदरच्या भूखंडाबाबतीत मार्केट उभारावे असे लेखी महापालिकेच्या तत्सम विभागांकडे मागणी नोंदविली आहे, ज्याचा अंतर्भाव नगरविकास विभागाने केला आहे. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनीदेखील सिडको व्यवस्थापकीय संचालक व महापालिका आयुक्त यांना सदर भूखंडाबाबत तात्काळ निर्णय घेऊन नागरिकांना सामाजिक सेवा देण्यात कसूर



करू नये असे निर्देश यापूर्वीच लेखी स्वरूपात दिलेले आहेत.

सिडको आणि महापालिकेच्या अंतर्गत समन्वयाच्या अभावामुळे या ठिकाणी दैनंदिन मार्केट व सामाजिक वापरासाठी बहुउद्देशीय अशी वास्तू अद्याप उभी राहिली नसून सदरचे ५०० चौ. मीटर चे भूखंड सामाजिक सेवेसाठी त्वरेने महापालिकेच्या मालमत्ता विभागाकडे हस्तांतरीत करावा, अशी मागणी दशरथ भगत व माजी नगरसेविका फशीबाई करसन भगत यांनी पुनःश्च एकदा केली आहे.

# फुंडे विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुलेंना अभिवादन



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचा १३५ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एम. बाबर, एस. एस. पाटील व उपस्थित शिक्षक वृंद यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील म्हणाले महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या पहिल्या पिढीतील समाजसुधारक आणि सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा फुले, मनुष्य जन्माने, जातीने या धनाने श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरत नाही. तो आपल्या कृतीने श्रेष्ठ व कनिष्ठ ठरत असतो अशी त्यांची धारणा होती.

ज्या काळात समाज अंधश्रद्धा, अज्ञान आणि जाती भेदाच्या खोल दरीत अडकला होता त्या काळात फुले दाम्पत्याने ज्योतिबा आणि सावित्रीबाईंनी ज्ञानाचा दिवा लावला. भारतीय समाजाला परिवर्तनाची नवी दिशा दिली.

सूत्रसंचालन श्रवण गोरे व आभार गौरव खर्जे यांनी मानले. कार्यक्रमाचे सुंदर नियोजन उपशिक्षिका व्ही. व्ही. गावंड यांनी केले.

# कळंबोलीत स्व. दादासाहेब लिमये यांना अनोखी मानवंदना

**कळंबोली : बातमीदार**

सुधागड एज्युकेशन सोसायटी पाली या शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दलितमित्र, निसर्गमित्र, आदिवासी सेवक, रायगड जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष शिक्षणमहर्षी स्वर्गीय दादासाहेब लिमये यांच्या ११६व्या जयंतीचे औचित्य साधून सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, कळंबोली येथील भव्य प्रांगणात विद्या संकुलातील चारही माध्यमातील जवळपास १६ हजार विद्यार्थी, ३०० पेक्षा जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांच्या संकल्पनेतून ५१ हजार दिवे लावून स्वर्गीय दादासाहेब लिमये यांना



अनोखी मानवंदना देण्यात आली.

सलग तिसऱ्या वर्षी ५१हजार दिवे प्रज्वलित करून विद्या संकुलातील विद्यार्थी , शिक्षक व पालकांना सकारात्मक ऊर्जेचा मूलमंत्र देण्यात देण्यात आला. अतिशय विलोभनीय असा या वर्षीचा हा दीपोत्सव सोहळ्याचे उद्घाटन कळंबोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कोते, रायगड जिल्हा पनवेल शिवसेना प्रमुख रामदास शेवाळे, पनवेल महानगर पालिकेचे माजी नगरसेवक विजय खानावकर, रवी भगत, विद्यासंकुलाचे माजी विद्यार्थी अजय सूर्यवंशी, प्राचार्य राजेंद्र पालवे यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी आणि शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करून दीपोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला.

या वेळी उपस्थित सर्व मान्यवर, सर्व माध्यमांचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी वंदेमातरम राष्ट्रगीत गाऊन आणि भारत माता की जय म्हणत दीपारती ओवाळून सर्वत्र दिव्यांची रोषणाई केली. सुधागड संकुलात एकाचवेळी प्रज्वलित झालेल्या ५१००१ दिव्यांच्या रोषणाईने विद्यासंकुल सह सर्वांचे चेहरे उजळून निघाले होते.

# झुनझुनवाला महाविद्यालयात संविधान दिन



**नवी मुंबई : बातमीदार**

आयसीएलईएस मोतीलाल झुनझुनवाला महाविद्यालय, वाशी येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन शैक्षणिक व सामाजिक जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने अत्यंत सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला.

प्राचार्या प्रा. डॉ. अनीता गोस्वामी गिरी यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

प्राचार्या प्रा. डॉ. गोस्वामी गिरी यांनी संविधानिक मूल्यांचे चिरस्थायी महत्त्व आणि न्याय्य, समावेशक राष्ट्रनिर्मितीतील त्यांची भूमिका स्पष्ट केली. सामाजिकशास्त्र विभागप्रमुख आशा बोडले यांनी आधुनिक सामाजिक परिप्रेक्ष्यात संविधानाचे स्थान व महत्त्व यावर आपली मते मांडली. इतिहास विभागप्रमुख आणि एनएसएस कार्यक्रम अधिकारी अश्विनी शिरसाठ यांनी प्राचार्या, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि संविधानाची प्रस्तावना वाचन करण्यासाठी प्राचार्यांना आमंत्रित केले.

या वेळी प्रा. मिनाक्षी रच्छ, प्रा. असरार सिद्दीकी, प्रा. जीवराज महीदा तसेच इतर प्राध्यापक, शिक्षक–वर्ग, कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्वनाथ नागरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# बीसीटी विधी महाविद्यालयात संविधान दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या संविधान स्वीकृतीच्या ७६व्या वर्धापन दिनानिमित्त भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. कायदेविषयक मदत समिती व राष्ट्रीय दिन उत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने आणि पनवेल न्यायालयाच्या कायदेविषयक मदत सेवांच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

संविधानिक मूल्यांवर आधारित पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेली सर्जनशील पोस्टर्स आणि त्यामागील विचार विशेष आकर्षण



ठरले. प्राचार्य डॉ. सानवी देशमुख यांनी आपण संविधान दिन का साजरा करतो? या विषयावर स्वागतपर भाषण करताना संविधानिक अधिकार, कर्तव्ये आणि मुख्य लोकशाही मूल्यांची महत्व स्पष्ट केली.

पनवेल न्यायालयातील ॲड. सहाईलेश कोंडस्कर, ॲड. स्वाती सोनावणे आणि ॲड. दिपाली बोहरा यांनी विशेष मार्गदर्शन करताना कायदेविषयक जागरूकता, न्यायप्रवेश आणि संविधानाने दिलेल्या समानतेच्या तत्त्वावर सखोल भाष्य केले. त्यांचा विद्यार्थ्यांशी झालेला संवाद कायदेविषयक साक्षरतेसाठी महाविद्यालय आणि पनवेल न्यायालय यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत करणारा ठरला.

मुख्य अतिथी आर. एन. चव्हाण, सहावे संयुक्त नागरी न्यायाधीश (वरिष्ठ विभाग) व अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी, पनवेल यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना संविधानिक मूल्यांचे महत्त्व, न्यायालयीन कर्तव्ये आणि भावी कायदेविषयक व्यावसायिकांच्या नैतिक जबाबदाऱ्यांवर सखोल मार्गदर्शन केले.

संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडाडे यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना समकालीन समाजातील संविधानिक तत्त्वांची उपयुक्तता समजावून सांगत लोकशाही मूल्ये जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचा समारोप सहाय्यक प्राध्यापक ऐश्वर्या पाटोळे यांच्या आभारप्रदर्शनाने झाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पनवेल न्यायालयाचे अधिवक्ता , शिक्षकवर्ग, विद्यार्थी स्वयंसेवक आणि सर्व उपस्थित यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# उरणमध्ये आज भाजप युतीची विजयी निर्धार सभा

**उरण : वार्ताहर**

उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक अनुषंगाने भाजप महायुतीची विजयी निर्धार सभा रविवार (दि.३०) नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब विष्णू धर्माधिकारी, उरण नगर परिषद मराठी शाळा प्रारांगांत आयोजित करण्यात आली आहे.

या सभेस भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार पनवेल विधानसभा प्रशांत ठाकूर, उरण आमदार विधानसभा महेश बालदी, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी पनवेल नगराध्यक्ष तथा भाजपा ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे आदी विशेष मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याचप्रमाणे भाजप महायुतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवारशोभा कोळी–शाह, महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य तथा उमेदवार रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष तथा उमेदवार सायली म्हात्रे, उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, रायगड जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत घरत, भाजप नेते सुधीर घरत, महालन विभाग अध्यक्ष महेश कडू, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, उरण तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे,उरण शहर मंडळ अध्यक्ष संपूर्णा थळी, जासई विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, उरणतालुका उपाध्यक्ष पंडित घरत, उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, संपर्क प्रमुख करण ठाकूर,रेय्यान तुन्गेकर आदीसह उरण तालुका, शहर भाजप कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# कामोठे येथील गटारांच्या दुरवस्थेची भाजप पदाधिकाऱ्यांकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे, सेक्टर ३४, परिसरातील गटार झाकणांची भीषण अवस्था लक्षात घेता नागरिकांनी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने तक्रारी नोंदवल्या होत्या. अनेक ठिकाणी गटारांची झाकणे पूर्णपणे तुटून आत कोसळली होती, परिणामी साचलेल्या पाण्यामुळे डास वाढीचा धोका निर्माण झाला होता. परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर संकट निर्माण होऊ नये यासाठी भाजपचे कामोठे शहराध्यक्ष व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभापती विकास घरत यांनी स्वतः पुढाकार घेत या ठिकाणीची पाहणी केली.

कामोठ्यातील स्थानिक नागरिक राजेंद्र बोबडे, रवींद्र पाढी, विजय सरगर, सचिन वाक्षे तसेच इतर रहिवाशांनी लक्षात आणून दिले होते. त्यांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत भाजप मंडळ अध्यक्ष विकास घरत व उपाध्यक्ष दामोदर चव्हाण यांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन संपूर्ण परिस्थितीची सखोल पाहणी केली.



पाहणी दरम्यान नागरिकांनी झाकणांची खराब स्थिती, साचलेले पाणी आणि त्यातून निर्माण झालेला आरोग्याचा धोका याबाबत सविस्तर माहिती दिली. यावर तत्काळ प्रतिक्रिया देत विकास घरत यांनी पनवेल महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना तसेच कामोठे विभागातील कॉन्ट्रॅक्टरला तातडीने याठिकाणी बोलावले. परिस्थितीची गंभीरता पाहून त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की सर्व तुटलेली गटार झाकणे ताबडतोब बदलण्यात यावीत आणि काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे. अधिकाऱ्यांना निर्देश देताना विकास घरत यांनी, नागरिकांच्या आरोग्याशी आणि सुरक्षेशी संबंधित कोणतेही काम विलंबाने होऊ नये. सार्वजनिक सुविधांची जबाबदारी ही प्रशासनाची प्राथमिक कर्तव्य आहे, असे स्पष्ट केले.

विकास घरत यांच्या पुढाकारामुळे दुरुस्तीचे काम सुरू होत असून येत्या काही दिवसांत सर्व झाकणें नव्याने बसवून सुरक्षित व्यवस्था तयार केली जाणार आहे. त्यामुळे परिसर अधिक स्वच्छ व राहणीमानास अनुकूल होणार आहे.

# नेरूळमध्ये महाकुंभभिषेक सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

तामीळनाडूतील श्री कांची कामकोटी पीठमचे श्री शंकराचार्य वीजयेंद्र सरस्वती संस्कृतीक आणि अद्यात्मिक कार्यक्रमासाठी दोन दिवसापासून नवी मुंबईतील नेरूळ येथे आहेत.

नवी मुंबईत नेरूळमधील साऊथ इंडिया एज्युकेशन सोसायटीच्या (एसआयईएस) संकुलात गुरुवारी सकाळी ११ ते १२ दरम्यान ३३ फूट उंच श्री हनुमानाच्या मूर्तीला महाकुंभाभिषेकम केले. यावेळी वेदपाठशाळेतील २०० विद्यार्थी समूहाने चतुर्वेद पारायण केले.



नादस्वरम आणि थविल यांच्या प्रतिध्वनीत आणि पुजाऱ्यांच्या मधुर वैदिक जप करीत हनुमान मूर्तीचा तिसरा महाकुंभभिषेक या वेळी झाला. हा एक हिंदू मंदिरातील विधी आहे असून शास्त्रांनुसार दर १२ वर्षांनी एकदा हा विधी केला जातो. सर्व अशुभ गोष्टी दूर करण्यासाठी आणि देशाची समृद्धी आणि शांती वाढविण्यासाठी हा विधी केला जातो.

देशभरातील सुमारे ५० वैदिक विद्वान वैदिक विधींमध्ये सहभागी झाले होते. देशातील सर्वात उंच हनुमान मूर्ती मानली जाणारी ही मूर्ती चेन्नईजवळील एका ठिकाणाहून खास निवडलेल्या एकाच ग्रॅनाइट दगडापासून बनवण्यात आली आहे. ९ फेब्रुवारी २००० रोजी कांची द्रष्टा दिवंगत श्री जयेंद्र सरस्वती यांनी तिचा अभिषेक केला होता.

हनुमानासह, श्री राम आणि त्यांच्या पत्नी, गणपती आणि आदी शंकराच्या मूर्तीसाठी कुंभाभिषेकम देखील करण्यात आला होता. या सोहळ्या नंतर शंकराचार्य वीजयेंद्र सरस्वती मुंबईत माटुंग्याच्या श्री शंकर मठातकडे जाण्यासाठी रवाना झाले.

# शिक्षकाच्या मागणीसाठीचे ग्रामस्थांचे आमरण उपोषण अखेर मागे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दूर्गम डोंगराळ भागातील रायगड जिल्हा परिषदेच्या कुडपण भाग प्राथमिक शाळेसाठी गेल्या दोन वर्षांपासून कायमस्वरूपी शिक्षकाच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी गुरूवारी सुरू केलेले आमरण उपोषण मध्यरात्रीच्या सुमारास संपुष्टात आले आहे.

रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समुपदेशनाद्वारे बदलीने अधिकृतरित्या प्रशांत तुळसुरकर या शिक्षकांची कुडपण भाग शाळेवर नेमणूक केली. परंतु ते शिक्षक शाळेवर हजर न होता एक ते दीड महिना मेडिकल रजेवर गेले व त्यानंतर दोन महिने होऊनही प्रशांत तुळसुरकर हे अद्याप शाळेवर हजर झालेले नाहीत, अशी तक्रार करताना ज्यादिवशी मेडीकल रजेवर गेले; त्यादिवशी ते अलिबागला शिक्षक पुरस्काराच्या






कार्यक्रमास उपस्थित असल्याचा फोटोही पुराव्यादाखल उपोषणकर्ते मंगेश चिकणे यांनी दाखविला.

यासंदर्भात गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांनी प्रशांत तुळसुरकर हे शिक्षक हजर होत नसल्याबाबतची कोणतीही माहिती पाठपुरावा करणाऱ्या ग्रामस्थांना न देता शिक्षकांना पाठिशी घालण्याचा प्रकार कुडपण गांव प्राथमिक शाळेबाबत गेल्या तीन ते चार वर्षे सुरू ठेवल्याचा आरोपही उपोषणकर्ते मंगेश चिकणे यांनी केला. यामुळे तात्पुरत्या स्वरूपात शिक्षक मिळाल्याने अध्यापन कार्य पूर्ण झाले तरी विद्यार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याची तक्रार यावेळी गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांना जबाबदार धरीत उपोषणकर्ते मंगेश चिकणे यांनी केली.

गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व सदस्य चंद्रकांत कळंबे यांच्यासह मध्यरात्रीच्या सुमारास आमरण उपोषणकर्त्यां कुडपण भाग शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मंगेश चिकणे व ग्रामस्थांना भेटून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळीदेखील गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांच्या बेजबाबदार आणि मनमानी कारभाराचा पाढा उपोषणकर्ते मंगेश चिकणे यांनी वाचला. यावेळी बेजबाबदार गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांच्याविरूध्द कारवाई करण्याची तसेच कायमस्वरूपी शिक्षकाची मागणी योग्य असल्याचे सांगण्यात आले. यानंतर मध्यरात्री उपोषण सोडण्यासाठी उपोषणकर्ते कुडपण ग्रामस्थांना विनंती करण्यात आली तसेच शुक्रवारी शिक्षकाचे समायोजन करण्याची ग्वाही यावेळी राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे आणि गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी दिल्यानंतर उपोषण संपुष्टात आले. यावेळी सहगटविकास अधिकारी हंबीर, भाजपचे तालुकाअध्यक्ष वैभव चांदे हेदेखील उपस्थित होते.

## साळाव येथे मॉडल संयुक्त राष्ट्र परिषद उत्साहात

**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे २४ आणि २५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित दुसऱ्या मॉडल संयुक्त राष्ट्र परिषदेला उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला.

पी.एन.पी. होली चाईल्ड शाळा (अलिबाग), जिंदल माउंट लिटेरा झी शाळा (नागोठणे), एम.डी.एन. आंतरराष्ट्रीय शाळा (रोहा) आणि जिंदल विद्या मंदिर या चार शाळांच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी सहभाग नोंदवला.

या आयोजनामागे विद्यालयाचे प्राचार्य मुकेश ठाकुर यांची दररोज–प्रत्येक विद्यार्थी नेता ही ठाम भूमिका आणि त्यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांचे सततचे प्रोत्साहनही या कार्यक्रमाला बळ देणारे ठरले.

महिला सक्षमीकरण परिषद, जागतिक आरोग्य परिषद, सामाजिक प्रश्न परिषद, अंमली पदार्थ प्रतिबंध परिषद आणि पर्यावरण परिषद या पाच समित्यांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध जागतिक प्रश्नांवर चर्चासत्रे घेतली. या चर्चांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि जागरूकता अधिक दृढ झाली.

समारोप समारंभाला विद्यालय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक आणि नीलू मलिक उपस्थित होते. त्यांनी उत्कृष्ट प्रतिनिधी व उत्कृष्ट संशोधक पुरस्कार विजेत्यांचा सन्मान केला.

कार्यक्रमाची आखणी अफीह बश्शा यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. दिनेश कानुगोजे, संदीप तिवारी (क्रीडा प्रमुख), अनिता बलायन (शैक्षणिक समन्वयक), अर्चना तोडणकर आणि अश्विनी काम्बळे यांनी केलेले परिश्रम विशेष उल्लेखनीय ठरले.



## 'आयआयटी बॉम्बे'चा 'लिव्हिंग लॅब'द्वारे जल, ऊर्जा जतनाचा सामाजिक संदेश



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगांव येथील वडघर येथे असलेल्या साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकामध्ये साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टचे जैवविविधता संवर्धन व संशोधन केंद्र आणि 'आयआयटी बॉम्बे' यांच्या संयुक्त विद्यमाने पाणी, ऊर्जा इत्यादी मूलभूत क्षेत्रांमध्ये शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान लक्ष केंद्रित मार्गदर्शक प्रकल्पाला समाजाभिमुख करण्यासाठी 'लिव्हिंग लॅब'चे लोकार्पण करण्यात आले.

याप्रसंगी साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक अध्यक्ष प्रमोद निगुडकर, जैवविविधता संवर्धन आणि संशोधन केंद्र अध्यक्ष संजय मंगला गोपाळ, जवाहर नागोरी, विष्णू प्रभुदेसाई, सुरेखा दळवी, आंबेडकर कॉलेजचे प्राचार्य बोराळे, अल्लाउद्दीन शेख, रवी देसाई, दीपक क्षीरसागर, केतन मजदेकर तसेच टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट सोल्यूशन्स सेलचे उन्नत महाराष्ट्र अभियान कक्ष 'आयआयटी बॉम्बे'चे प्रकल्प प्रमुख राजाराम देसाई, शेप फाऊंडेशनचे प्रसाद कुलकर्णी, सातारा रिन्यूएबल्सचे आनंद टेंबे तसेच विश्वस्त सिरत सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास आयआयटी बॉम्बेच्या टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट सोल्यूशन्स सेल आणि उन्नत महाराष्ट्र अभियान कक्षाचे प्रकल्प प्रमुख राजाराम देसाई यांनी अन्य तंत्रज्ञ व शास्त्रज्ञांसह उपस्थित राहून विद्यार्थी तसेच उपस्थितांना मार्गदर्शन करताना वैज्ञानिक उपक्रम विद्यार्थी व सहलींद्वारे समाजापर्यंत पोहोचविण्याची अपेक्षा अधोरेखित केली. पहिल्या टप्प्यामध्ये ४ किलोवॅट सोलर नेट मीटरिंग (ग्रिड–कनेक्टेड) प्रणालीची कार्यपध्दती विषद करून सातारा रिन्यूएबल्सचे आनंद टेंबे यांनी सोलार शाश्वत ऊर्जा या अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताबाबत मार्गदर्शन केले. पाणी बचतीसाठी हॅंड वॉश स्टेशन तसेच वीज न लागणारी गुरुत्वाकर्षण आधारित पिण्याच्या पाण्याची अल्ट्राफिल्ट्रेशन यंत्रणा यांची प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यापूर्वी टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट सोल्यूशन्स सेलचे उन्नत महाराष्ट्र अभियान कक्ष 'आयआयटी बॉम्बे'चे प्रकल्प प्रमुख राजाराम देसाई यांनी सादरीकरण करताना शाश्वत विकास, शाश्वत ऊर्जा व प्रगत तंत्रज्ञान यांची सांगड घालणाऱ्या 'प्रोजेक्ट आऊटरिच' या प्रकल्पाची संकल्पना व उद्दिष्ट या विषयावर माहिती दिली.

शेप फाऊंडेशनचे प्रसाद कुलकर्णी यांनी वीज न लागणारा भाजी व फळे साठवण्यासाठी सब्जी कूलर याबाबत माहिती पुरवून पर्यावरणपूरकता तसेच ऊर्जा व पाण्याची बचत करण्यासंदर्भात समाजजागृतीचे आवाहन केले. पिण्याच्या पाण्याची अल्ट्रा फिल्ट्रेशनपध्दतीबाबत प्रसाद कुलकर्णी यांनी आरओद्वारे पाण्याचा वापर केल्यास प्रचंड प्रमाणात पाण्याची नासाडी होते. यामध्ये झिंक, तांबे, लोखंड तसेच अन्य क्षार नष्ट झाल्याने मृत पाण्याचा बाटलीबंद पाणी म्हणून वापर केला जात असल्याने हल्ली या खनिज व क्षारांचा समावेश पिण्याच्या पाण्यामध्ये जाणीवपूर्वक केला जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने आरओच्या वापराबाबत आक्षेप घेतले असून ग्रामीण भारतातील पाणी पिण्यायोग्य असल्याने बंदीसदृश्य कठोर भूमिका घेतल्याचे यावेळी सांगितले.

गोरेगाव येथील ना.म.जोशी विद्याभवनचे तसेच ए.के.आय ऊर्दू हायस्कूलचे विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त सिरत सातपुते यांनी केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे अंतर्गत संविधान जागर अभियान

**मुरुड : प्रतिनिधी**

महासंचालक सुनील वारे, विभाग प्रमुख . डॉ. बबन जोगदंड, निबंधक . विशाल लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान जागर अभियान सप्ताह राबवण्यात येत असून, या अभियानांतर्गत तालुकास्तरीय, शाळा व महाविद्यालय यांच्या स्तरावर संविधानाविषयी जनजागृती करण्याकरिता विवीध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

कोकण एज्युकेशन सोसायटी



संचलित .म.ह. दिवेकर वाणदे हायस्कूल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. संविधान उद्देशिका पत्रिकेचे सामूहिक वाचन केले व प्रश्नमंजुषाच्या माध्यमातून संविधानाविषयी प्रश्न विचारून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा घेतली, वकृत्व स्पर्धा घेण्यात आली, तसेच वॉक फॉर संविधान रॅली काढण्यात आली. या रॅली मध्ये घोषणांच्या माध्यमातून जनतेला संविधानाचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न केला. जिल्हा परिषद. मराठी शाळा खारआंबोली येथे विद्यार्थ्यांमध्ये संविधान या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व सांगण्यात आले. चित्रकला स्पर्धेत विजेते प्रथम क्रमांक सम्यक निलेश जाधव, द्वितीय क्र. कु. रुद्र ऋषिकेश कमाने, तृतीय क्र. कु. शिवन्या वसंत खंडागळे, चतुर्थ क्र. कु. मनन गणेश आरकशी. उपस्थित वांणदे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री समीर जटारी, शिक्षक श्री. दिपक भोय, बार्टी समतादूत सौ. वैशाली खरपडे–पेरवे, खारआंबोली शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उषा नाईक, सौ. गीता भगत,. जयश्री गोलवाला व श्री. प्रदीप वळवी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## संभाजी ब्रिगेडमार्फत गुड टच बॅड टच जनजागृती कार्यक्रम

**माणगाव : बातमीदार**

संपूर्ण देशभरासह आपल्या साधू–संत तसेच महापुरुषांच्या महाराष्ट्र राज्यातदेखील समाजातील काही विकृत प्रवृत्तीने हृदयाला हेलावून टाकणाऱ्या अश्या बालकांवरील लैंगिक शोषण, अत्याचार तसेच निर्घृण हत्या घटनांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना आपल्या स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडाच्या परिसरातील महाड तालुक्यामध्ये देखील मागील काही महिन्यापासून अश्या बाळ लैंगिक अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत

याच अनुषंगाने गुरुवार( दि २७) रोजी श्री छत्रपती माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मु.पो.वरंध ता.महाड, या



ठिकाणी संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रविणदादा गायकवाड आणि रायगड जिल्हाध्यक्ष वैभव हरिश्चंद्र सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजी ब्रिगेड रायगड जिल्हा अंतर्गत महिला व बालकल्याण समिती तसेच दामिनी पथक महाराष्ट्र पोलिस यांच्या विशेष सहकार्याच्या माध्यमातून गुड टच बॅड टच हा जनजागृतीचा कार्यक्रम शाळेमधील जवळपास २०० ते २५० विद्यार्थ्यांमध्ये यशस्वीपणे पार पडला.

यादरम्यान शाळांमधील मुला–मुलींमध्ये या कार्यक्रम व उपक्रमांद्वारे चांगला स्पर्श किंवा वाईट विटाळ स्पर्शाविषयी (गुड टच, बॅड टच) जागृती, वर्गातील मुला–मुलींसाठी चांगला स्पर्श–वाईट स्पर्शाविषयी जागृती, शारिरीक, मानसिक पीडा, लैंगिक शौषण यासारखे प्रसंग मुला–मुलींसोबत घडल्यास त्यांनी भीती न बाळगता याबाबत शिक्षक, पालक, मित्र–मैत्रिणी, विश्वासू व्यक्तींना माहिती द्यावी, यासाठी त्यांच्यात धैर्य निर्माण करण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून हा जनजागृतीचा उपक्रम राबवण्यात आला होता.

यावेळी संभाजी ब्रिगेड रायगड जिल्हाध्यक्ष वैभव हरिचंद्र सुर्वे, महाड तालुकाध्यक्ष कैलास अटक,महाड तालुका संघटक सुनील सुतार, महाड शहराध्यक्ष तसेच समिती अध्यक्ष महेश मेहता,महाड शहर सचिव संकेत रेणुसे, जिल्हा महिला आघाडी संघटक हर्षदाताई सुतार तालुका उपाध्यक्ष–महिला आघाडी तथा बालकल्याण समिती अध्यक्ष वैष्णवी देशमुख, तालुका सचिव हर्षदा सुतार पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान रायगड जिल्हाध्यक्ष शिवश्री वैभव सुर्वे यांनी आपल्या मनोगतामध्ये महिला व बाळ लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाना छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्कालीन स्वराज्यामध्ये अस्तित्वात असलेली चौरंग या शिक्षेची तत्काळ अंमलबजावणी करावी तसेच भविष्यात रायगड जिल्ह्यामधील प्रत्येक तालुक्यामध्ये जास्तीत जास्त अश्याच प्रकारे प्राथमिक तसेच माध्यमिक शाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन संभाजी ब्रिगेडमार्फत या जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येतील अशी घोषणा केली.

दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक नामदेव तुकाराम दिघे सर, श्री संजय रघुनाथ देशमुख सर , दीक्षा तपकिरे मॅडम, शेळके मॅडम, अनिल सपकाळ सर,समीर पवार सर यांनी संभाजी ब्रिगेडचे काळाची गरज ओळखून या विशेष कार्यक्रमाचे आपल्या शाळेत आयोजन केल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## गाणी व कोंढेतर्फे श्रीवर्धन गावांमध्ये नाचणी पिकाचे वैज्ञानिक मॉडेल यशस्वी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील श्रीवर्धन तालुक्यातील गाणी आणि कोंढे तर्फे श्रीवर्धन या महसूली गावांनी नाचणी (ऋळपसशी चळश्रश्रशीं) पिकाच्या वैज्ञानिक पद्धतींवरील लागवड व्यवस्थापनामुळे कृषी क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. या दोन्ही गावांमध्ये सुमारे ५० हेक्टर क्षेत्रावर नाचणीची नियोजनबद्ध पेरणी करण्यात येते. कोकणातील डोंगरउतार, मुरमाड ते हलक्या प्रकारची जमीन, मध्यम पर्जन्यमान आणि उत्तम निचऱ्याची क्षमता या सर्व घटकांमुळे नाचणी पिकासाठी अनुकूल कृषी जलवैज्ञानिक परिस्थिती निर्माण होते.

शेतकऱ्यांनी बीजशुद्धीकरण, योग्य पेरणी अंतर, आंतरमशागत, सेंद्रिय खत व्यवस्थापन व तणनियंत्रण यांसारख्या तांत्रिक बाबींचा प्रभावी अवलंब केला



आहे. यामुळे पिकातील काड–पान संतुलन (Crop Canopy Management) राखले जाऊन उत्पादन क्षमतेत वाढ होत आहे.

या कृषी पद्धतीमुळे गाणी व कोंढे तर्फे श्रीवर्धन या गावांमध्ये प्रति हेक्टर सरासरी १२.५ क्विंटल (१२५० किलो) इतके समाधानकारक उत्पादन मिळत आहे. डोंगरउतारांवरील नाचणीमुळे मृदधूप नियंत्रण (Soil Erosion Control) व मातीची कार्बन क्षमता (Soil Organic Carbon) टिकून राहण्यास मदत होते, हे महत्त्वाचे आहे.

नाचणी हे कॅल्शियम, आहारतंतू, अमिनो ॲसिड्स आणि सूक्ष्म पोषक तत्वांचे उत्कृष्ट स्त्रोत असल्याने स्थानिक आहारातील पोषणस्थितीही सुधारते. शिवाय, उत्पादन खर्च तुलनेने कमी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पन्नात वाढ दिसून येत आहे.

कृषी तज्ज्ञांचे मत आहे की, या भागात सुधारित वाणांचे (Improved Varieties) प्रचार–प्रसार, मायक्रो–इरिगेशनचा वापर, योग्य विपणन साखळी (Value Chain Development) आणि शेतकरी गटशेतीकरण या उपक्रमांना चालना दिल्यास नाचणीचे हेक्टरी उत्पादन आणखी वाढू शकते.

गाणी आणि कोंढे तर्फे श्रीवर्धन या गावांचा हा नाचणी लागवडीचा वैज्ञानिक, टिकाऊ आणि आर्थिक दृष्ट्या फायदेशीर मॉडेल कोकणातील इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो आहे.

## माणगावात गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा ३५० व शहिदी समागम उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

त्याग आणि समर्पणाचे प्रतीक हिंद – दि – चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त विशेष किर्तन आणि गुरु का लंगर कार्यक्रम शनिवार दि.२९ नोव्हेंबर सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत गांधी मैदान, नाणोरे फाटा, माणगाव याठिकाणी उत्साहात साजरा झाला.

या समागम कार्यक्रमास शीख बांधव – भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे ,विद्यार्थ्यांचे,नागरिकांचे कार्यक्रमाचे निमंत्रक रायगड सिख सेवा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यावतीने आकर्षक सन्मान चिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आले.

माणगाव शहरातील नागरिकांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येऊन भव्य स्मरणोत्सवाचे आयोजन केले होते. धार्मिक स्वातंत्र्य,मानवता आणि सत्यासाठी प्राण अर्पण करणाऱ्या महान योद्ध्याच्या बलिदानाची ही प्रेरणादायी आठवण सर्व समाजात आदराने साजरी करण्यात येत असते. सन १६७५ मध्ये मुघल अत्याचारांविरुद्ध आणि काश्मीरी



पंडितांच्या संरक्षणासाठी उभे राहताना गुरु तेग बहादुरजींनी दिल्लीच्या चांदणी चौकात आपले मस्तक अर्पण केले होते. धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेले त्यांचे हे बलिदान इतिहासात हिंद की चादर म्हणून सुवर्णाक्षरांनी कोरले गेले. याच प्रसंगाचे वर्णन करणारी गुरु गोविंदसिंहजींची अमर कविता तिलक जंञू राखा प्रभ ताका याचे सखोल अर्थासह वाचन या समारंभात करण्यात आले.

गुरु तेग बहादूर जींच्या शहादतीने मानवजातीला दिलेला संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. धर्मासाठी जर मस्तक द्यावे लागले तरी चालेल, पण अधर्मासमोर कधी न झुकावे. या दिवशी श्री गुरु ग्रंथ साहिब यांचा प्रकाश,सुखमणी साहिब पाठ (बिबियां दा जथा – पुणे) चहा आणि पकोडा लंगर,गुरु तेग बहादूर साहेबांचा इतिहास,'सरबत दा भला' अरदास व गुरु का लंगर वाटप असे कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॅप्टन निर्मलसिंग रंधावा,गुरविंदर सिंह सोडी,वरिंदर सिंग बर्मन,गुरुविंदर सिंह भाटिया व सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डब्ल्यूपीएलच्या शेड्यूलची घोषणा


## पहिल्या मॅचपासून ते फायनलपर्यंत संपूर्ण वेळापत्रक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआयने) आगामी महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या स्पर्धेच्या चौथ्या हंगामाला ९ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. तर स्पर्धेतील अंतिम सामना ५ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे.

या स्पर्धेतील सामने नवी मुंबईतील डी.वाय. पाटील आणि वडोदरा या दोन शहरांमध्ये खेळवले जाणार आहेत. स्पर्धेतील उद्घाटनाचा सामना गतविजेत्या मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन्ही संघांमध्ये होणार आहे. नवी मुंबईत होणारे सामने ९ ते १७ जानेवारी दरम्यान खेळवले जाणार आहेत. त्यानंतर पुढील सामने आणि प्लेऑफ्स आणि फायनलचा सामना देखील वडोदरात खेळवला जाणार आहे.

वडोदरातील पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि



गुजरात जायंट्स या दोन्ही संघांमध्ये खेळवला जाणार आहे.या स्पर्धेतील साखळी फेरीतील सामने १ फेब्रुवारीपर्यंत खेळवले जाणार आहेत. त्यानंतर ३ दिवसांची विश्रांती असेल. जो संघ गुणतालिकेत सर्वोच्च स्थानी असेल, तो संघ थेट अंतिक फेरीत प्रवेश करेल. तर दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानी असलेला संघ एलिमिनेटरचा सामना खेळणार. त्यानंतर ५ फेब्रुवारीला स्पर्धेतील अंतिम सामना खेळवला जाईल.

**असं आहे संपूर्ण वेळापत्रक**

९ जानेवारी: मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, नवी मुंबई, १० जानेवारी: यूपी वॉरियर्स विरुद्ध गुजरात जायंट्स, नवी मुंबई, १० जानेवारी: मुंबई इंडियन्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स, नवी मुंबई, ११ जानेवारी: दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध गुजरात जायंट्स, नवी मुंबई, १२ जानेवारी: रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध यूपी वॉरियर्स, नवी मुंबई, १३ जानेवारी, मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात जायंटस, नवी मुंबई, १४ जानेवारी: यूपी वॉरियर्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स, नवी मुंबई, १५ जानेवारी: मुंबई इंडियन्स विरुद्ध यूपी वॉरियर्स, नवी मुंबई, १६ जानेवारी: रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध गुजरात जायंटस, नवी मुंबई, १७ जानेवारी: यूपी वॉरियर्स विरुद्ध मुंबई इंडियन्स, नवी मुंबई, १७ जानेवारी: दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, नवी मुंबई, १९ जानेवारी: गुजरात जायंट्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, वडोदरा, २० जानेवारी : दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध मुंबई इंडियन्स, वडोदरा, २२ जानेवारी: गुजरात जायंट्स विरुद्ध यूपी वॉरियर्स, वडोदरा, २४ जानेवारी: रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स, वडोदरा, २६ जानेवारी: रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध मुंबई इंडियन्स, वडोदरा, २७ जानेवारी: गुजरात जायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स, वडोदरा, २९ जानेवारी: यूपी वॉरियर्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, वडोदरा, ३० जानेवारी: गुजरात जायंट्स विरुद्ध मुंबई इंडियन्स, वडोदरा, १ फेब्रुवारी: दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध यूपी वॉरियर्स, वडोदरा, ३ फेब्रुवारी: एलिमिनेटर, वडोदरा, ५ फेब्रुवारी: फायनल, वडोदरा.

# आरडीसीएच्या स्पर्धेत भेंडखळ क्रिकेट अकॅडमी संघ अंतिम फेरीत दाखल



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत, भेंडखळ क्रिकेट अकॅडमी उरण संघाने उपांत्य फेरीच्या सामन्यात एजे स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमी संघावर ४८ धावांनी दिमाखदार विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे.

उपांत्य फेरीच्या सामन्यात भेंडखळ संघाने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करतांना ३९.५ षटकात १० गडी गमावत १८१ धावा फलकावर नोंदवल्या त्यामध्ये दक्ष पाटील यांनी सर्वाधिक ५१ श्लोक कोळी ४२ तर जिदनेश म्हात्रे यांनी बहुमूल्य २८ धावा काढून संघाला योगदान दिले. एजे स्पोर्ट्स कडून साईराज जोशी, श्लोक साळुंके, अंश यादव यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. प्रतिउत्तर देताना एजे स्पोर्ट्स अकॅडमी संघाचा डाव ३६.२ षटकात सर्व गडी बाद १३३ ह्या धावसंख्येवर आटोपला.

प्रणित उलवेकर यांनी सर्वाधिक ४७ तर मिलन चौरसिया यांनी २७ धावा संघासाठी काढल्या. भेंडखळ संघाकडून तृषभ गावंड व अभिषेक वर्मा यांनी प्रत्येकी ३ तर विघ्नेश पाटील व जिदनेश म्हात्रे यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद करत संघाला ४८ धावांनी दिमाखदार विजय मिळवून देत स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी प्रवेश निश्चित केला आहे.संघाचे मुख्य प्रशिक्षक जावेद खान, हझीक नदीम, शरद म्हात्रे भेंडखळ क्रिकेट अकॅडमी उरण संघाचे अध्यक्ष संदिप पाटील सचिव मनोज भगत यांनी खेळाडूंनी मैदानावर केलेल्या कामगिरीवर आनंद व्यक्त करत अंतिम सामन्यासाठी संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.





# आयुष म्हात्रेचे तुफानी शतक

## सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत मुंबईचा विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

अंडर १९ आशिया कप स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी मिळताच आयुष म्हात्रेने मुंबई वरिष्ठ संघाकडून शतकी धमाका केला आहे. सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत विदर्भ संघाविरुद्धच्या सामन्यात धावांचा पाठलाग करताना त्याने २००पेक्षा अधिकच्या स्ट्राइक रेटने धावा करताना ४९ धावांत शतक साजरे केले. त्याच्या या खेळीच्या जोरावर १९३ धावांचे लक्ष्य मुंबईने १३ चेंडू आणि सात गडी राखून पार केले.

विदर्भ संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ९ बाद १९२ धावा करत मुंबईच्या संघासमोर १९३ धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना १८ वर्षीय आयुष म्हात्रे याने अनुभवी अजिंक्य रहाणेच्या साथीने मुंबई संघाच्या डावाची सुरुवात केली. दुसऱ्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर अजिंक्य रहाणे खातेही न उघडता माघारी फिरला. त्याच्या पाठोपाठ हार्दिक तामोरेही स्वस्तात बाद झाला.

आयुष म्हात्रे आणि सूर्यकुमार यादव जोडी जमली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ५९ चेंडूत ८८ धावांची भागीदारी रचली. सूर्यकुमार यादव ३५ धावा करून परतल्यावर आयुषने शिवम दुबेच्या साथीने ३५ चेंडूत ८५ धावांची भागीदारी रचत संघाला अगदी सहज विजय मिळवून दिला. आयुषने ५३ चेंडूत आठ चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने २०७.५५च्या स्ट्राइक रेटने ११० धावांची नाबाद खेळी साकारली.

**सूर्यादादाने थोपटली पाठ**

आयपीएलच्या गत हंगामात आयुष म्हात्रे सीएसकेच्या ताफ्यातून खेळताना दिसला होता. संधी मिळालेल्या मोजक्या सामन्यात त्याने आपल्यातील बॅटिंगमधील क्षमता दाखवून दिली. त्यानंतर त्याला इंडिया 'अ' संघाकडूनही संधी मिळाली. आगामी अंडर १९ आशिया कप स्पर्धेत तो भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. बीसीसीआयने त्याच्याकडे कर्णधारपद सोपवताच त्याच्या भात्यातून कडक सेंच्युरी आल्याचे पहायला मिळाले. भारतीय टी-२० संघाचा कर्णधारही या युवा बॅटरच्या खेळीने प्रभावित झाला आहे. इन्टास्टोरीच्या माध्यमातून आयुष म्हात्रेसोबतचा फोटो शेअर करत सूर्यादादाने युवा बॅटरची पाठ थोपटली आहे.

## रोहितकडे पहिल्या सामन्यात इतिहास घडवण्याची संधी!



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना ३० नोव्हेंबरला रांचीत खेळवला जाणार आहे. या मालिकेत भारताचे स्टार फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा ही जोडी पुनरागमन करताना दिसणार आहे.

गेल्यावेळी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना रोहित शर्माने तिसऱ्या वनडे सामन्यात दमदार शतकी खेळी केली होती. आता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या मालिकेतही त्याच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असणार आहे. दरम्यान या मालिकेत ९८ धावा करताच त्याला मोठा विक्रम मोडून काढायची संधी असणार आहे.

# उलवे येथे तामिळनाडू विरुद्ध प्रीस्टीन ठाणे संघात सराव सामना

**अलिबाग : प्रतिनिधी**

पनवेल, उलवे येथील सुप्रसिद्ध असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट अकॅडेमीच्या क्रीडांगणावर काल तामिळनाडू राज्यातील संघ विरुद्ध प्रीस्टीन क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी ठाणे ह्या दोन पंचवीस वर्षाखालील मुलांच्या संघांमध्ये सराव सामन्याचे आयोजन करण्यात आले होते.

रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आलेल्या सुसज्ज,आधुनिक व क्रिकेटसाठी अत्यंत अनुकूल असणार क्रीडांगणावर सामन्याचा आनंद दोन्ही संघाने घेतला. हे मैदान सरावासाठी उपलब्ध करून दिलेल्या बद्दल तामिळनाडू



राज्यातील क्रिकेट असोसिएशनचे सदस्य ए.के.सतिष, मुख्य प्रशिक्षक अशोक आनंद, प्रिस्टीन क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रशिक्षक पंकज जासवाल, अरविंद पटेल यांनी मैदान समितीच्या लोकांचे आभार मानले.

उलव्याचे मैदान येथील खेळपट्टी व खेळाडूंसाठी उत्कृष्ट दर्जाची सुविधा क्रिकेट खेळासाठी उत्तम असल्याचे प्रमाण दोन्ही संघाच्या खेळाडू व व्यवस्थापक सदस्यांनी दिले आहे. गतवर्षी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या आंतरजिल्हा सोळा वर्षाखालील मुलांची निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेतील काही सामने सुद्धा ह्याच मैदानावर आयोजित करण्यात आले होते. येणाऱ्या क्रिकेट हंगामात एमसीएच्या वतीने विविध वयोगटातील आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेतील सामन्याचे ह्याच मैदानावर होणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण उलवे येथे चांगल्या दर्जाचे सामने होत राहिल्यास ह्या विभागातील क्रिकेटला नवीन उंची मिळणार असून येथील क्रिकेट अकॅडेमीच्या खेळाडूंमध्ये सुधा लेदर बॉल क्रिकेटच्या संस्कृतीला अधिक बळकटी मिळेल व स्थानिक खेळाडूंमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण होईल.

# भारतीय रेसिंग सेन्सेशन अतिका मीरने रचला इतिहास!

**अल ऐन : वृत्तसंस्था**

भारताची उदयोन्मुख रेसिंग सेन्सेशन अतिका मीर हिने आंतरराष्ट्रीय कार्टिंग मालिकेत जागतिक दर्जाच्या पुरुष ड्रायव्हर्सना मागे टाकून पात्रता फेरीत चौथे स्थान पटकावले. या चॅम्पियनशिपच्या इतिहासात कोणत्याही महिला रेसरने मिळवलेले हे सर्वात मोठे यश आहे. फॉर्म्युला वन अकादमी आणि अक्सल जीपीच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या ११ वर्षांच्या जम्मू-काश्मीरच्या प्रतिभावान अतिका मीरने आपल्या रेसिंगच्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

पहिल्या दिवशी पात्रता फेरीत मिनी गटात अतिकाने चौथे स्थान मिळवले, जो एका महिलेसाठी या मालिकेतील विक्रमी उच्चांक आहे. अंतिम फेरीत अतिकाने चौथ्या स्थानावर रेस पूर्ण केली. पॉडियम फिनिश (पहिले तीन स्थान) केवळ ०.०७ सेकंदांनी हुकला. दुसऱ्या दिवशी पात्रता फेरीत अतिकाने पुन्हा एकदा प्रभावी कामगिरी करत पाचवी सर्वात जलद वेळ



नोंदवली. अंतिम फेरीत ती शर्यतीच्या बहुतेक भागांमध्ये पोडियमच्या शर्यतीत होती. शेवटच्या लॅपमध्ये धाडसी ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात तिने तिसरे स्थान गमावले, तरीही तिने २८ ड्रायव्हर्सपैकी सन्माननीय सातवे स्थान मिळवले.

अतिकाचे वडील, आसिफ मीर (माजी फॉर्म्युला एशिया उपविजेता), यांनीही तिच्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, या आठवड्यात अतिकाची कामगिरी उत्कृष्ट होती. तिने जगातील सर्वोत्कृष्ट ड्रायव्हर्सच्या स्पर्धेत सातत्याने चांगली कामगिरी केली आणि त्यांना हरवलेदेखील. आम्ही गेल्या काही महिन्यांपासून घेत असलेल्या कठोर परिश्रमाचे हे प्रोत्साहन आणि फळ आहे.

*या आठवड्यात जगातील अव्वल ड्रायव्हर्ससोबत काही कठीण शर्यती झाल्या. दोन्ही दिवस माझा चांगला वेग होता आणि मी पात्रता फेरीत तसेच फायनलमध्ये अपेक्षित निकाल देऊ शकले. चॅम्पियनशिपचे चांगले गुण मिळाले आहेत. पुढील आठवड्यात होणाऱ्या सिझन फायनलसाठी मी उत्सुक आहे. मालिकेचा सिझन फायनल पुढील आठवड्यात अल फुरसान येथे होणार आहे.*

**-अतिका मीर**

## कपिल देव यांनी सांगितली टीम इंडियाच्या पराभवाची कारणे

**चेन्नई :** न्यूझीलंड पाठोपाठ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारतीय क्रिकेट संघाने कसोटी मालिका गमावल्या. फिरकी गोलंदाजीविरुद्ध अपयशाची कारणे सांगताना कपिल देव म्हणाले, आजचे किती टॉप खेळाडू देशांतर्गत क्रिकेट खेळत आहेत. जर तुम्ही देशांतर्गत क्रिकेट खेळला नाहीत आणि दर्जेदार गोलंदाजांना सामोरे गेला नाहीत, तर तुम्हाला संघर्ष करावाच लागेल. ते म्हणाले, ज्या खेळपट्ट्यांवर खेळ दोन किंवा अडीच दिवसांत संपतो, त्यांचा काय उपयोग? ज्या खेळपट्ट्यांवर कोणताही संघ २०० धावा ओलांडत नाही, त्या पाच दिवसांच्या खेळासाठी चांगल्या नाहीत. अशा फिरकी किंवा सीम-सहाय्यक पृष्ठभागांवर खेळण्यासाठी फलंदाजांना संयम आणि वेगळ्या कौशल्याची आवश्यकता असते.


**बस विकणे आहे**

चालू कंडिशनची टाटा अल्ट्रा बस २०१७ मेक ४० सीटर सेमी डिलक्स **बस क्र. MH46BB0357** विकणे आहे. बसचा वापर पेशंटच्या ने-आण करण्यासाठी केलेला आहे. जशी आहे तशी बस विकणे आहे. टॅक्स, इन्शुरन्स भरलेला आहे. बस बघण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी संपर्क -

**श्री. प्रविण तळेगावकर - ९५९४९८६८३७**

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट, पनवेल



### खेलो इंडियात महाराष्ट्राचे महिलाराज, हमालाच्या मुलींचा पदकाचा चौकार

# आदिती, गीतांजली, दिक्षा, भक्ती, वैष्णवी, संस्कृतीची पदकांची लयलूट

**जयपूर : प्रतिनिधी**

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील पाचव्या पर्वात महाराष्ट्राच्या मुलींची मक्तेदारी दिसून आली. अपेक्षेप्रमाणे आर्चरीत विश्वविजेत्या आदिती स्वामीने सोनेरी वेध घेत घेतला. वेटलिफ्टिंगमध्ये गीतांजली जगदाळेने सुवर्ण, वैष्णवी पवारने रौप्य पदक पटकावले. हमालीची मुलगी असणाऱ्या भक्ती वाडकरने ४ पदकाची लयलूट केली आहे तर घरात कुस्तीचा वारसा असणाऱ्या संस्कृती पाटीलने ज्युदोत कांस्य पदकाची कमाई करीत दिवस गाजविला.

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत पुणे, शिवाजी विद्यापीठीच्या खेळाडूंची विजयी घोडदौड कायम आहे. या यशात महाराष्ट्राची



मुलींनी पदकाची बाजी मारली आहे. शिवाजी विद्यापीठाकडून खेळताना अपेक्षेप्रमाणे आदिती स्वामीने कंपाऊंड महिला वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. वेटलिफ्टिंगमधील ६३ किलो वजन गटात १६७ किलो वजन उचलून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गीतांजली जगदाळे सुवर्णपदकाला गवसणी घातली.

जलतरण तलावातही महाराष्ट्राच्या मुलींनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दिक्षा यादवने १५०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्य, २०० मीटर फ्रीस्टाईल, ८०० मीटर फ्रीस्टाईल, फ्रीस्टाईल व मिडले रिले शर्यतीत कांस्य अशी पाच पदके जिंकण्याचा पराक्रम केला आहे. भक्ती वाडकरनेही १ रौप्य ३ कास्य पदकाचा चौकार झळकविला. तिचे वडिल राहूल वाडकर हे कोल्हापूरमधील राधरनगरी शासकीय धान्य गोदाम या हमालाची नोकरी करीत असहेत. भक्तीने ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये रूपेरी यश संपादन केल्यानंतर २०० मीटर बॅकस्ट्रोक, फ्रीस्टाईल व मिडले रिले शर्यतीत कांस्य पदकाची कमाई केली. शासनाच्या पुण्यातील क्रीडा प्रबोधिनी ती कसून सराव करीत असते. गत आसामधील स्पर्धेत १ सुवर्ण ३ रौप्य १ कांस्य अशी पाच पदकाची कमाई भक्तीने केली होती.

आहिल्यानगरमधील भाजीपाला विक्रेत्याची मुलगी असणाऱ्या वैष्णवी संतोष पवारने वेटलिफ्टिंगमधील ८० किलो वजन गटात रूपेरी पदकाचा करिश्मा घडविला.

कोल्हापूरतील शिवाजी विद्यापीठाच्या संस्कृती पाटीलने ज्युदोतील महिलांच्या ७८ किलो वजनी गटात कांस्य पदकाची कमाई केली आहे. कोल्हापूरतील कोतोली गावचे प्रथम लोकनियुक्त सरपंच प्रकाश पाटील यांची संस्कृती ही कन्या असून तिचे आजोबा मारुती पाटील व चुलते अरूण पाटील कुस्तीगीर होते. पुण्यातील क्रीडा प्रबोधिनीत ती सराव करत असते. घरात कुस्तीचा वारसा असताना तिने कुस्ती सोडल्यानंतर ज्युदो खेळात चकमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले आहे.




सौजन्य : श्री. अमित जाधव (जिल्हाध्यक्ष, उ.रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा भाजपा)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com